

डॉ. सौ. स्वप्नाली
अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ :
सकाळी १० ते दुपारी १
व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा,
नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
गुरूवार, दि. १८ डिसेंबर २०२५




दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०३३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# पिंपरीत महायुतीत शह-काटशह; नगरसेवक फोडाफोडी

**पिंपरी : (समर्थ गांवकरी)**

पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केल्यानंतर आता महायुतीमधील या दोन्ही पक्षांनी माजी नगरसेवकांची फोडाफोडी सुरू केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'ने भाजपच्या दोन माजी नगरसेविकांना पक्षात प्रवेश दिल्यानंतर आता भाजपही राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला धक्का देण्याच्या तयारीत आहे. या पक्षाच्या एका माजी महापौरांसह काही माजी नगरसेवक दोन दिवसांत भाजपवासी होणार असून हे पक्षप्रवेश मुंबईत केले जाणार असल्याचे भाजपमधील सूत्रांनी सांगितले. पिंपरी-चिंचवड हे एकेकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला होता. मात्र, २०१७ मध्ये भाजपने तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसकडून सत्ता खेचून घेतली. भाजपचे तीनवरून ७७ नगरसेवक झाले. शहरावर १५ वर्षे एकहाती राज्य करणाऱ्या पवार यांनी महापालिका निवडणुकीत भाजपसोबत युती व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांच्या पक्षाच्या बहुतांश माजी नगरसेवकांचीही युती व्हावी अशीच भूमिका होती. परंतु, शहर भाजपने स्वबळावर लढण्याचा आग्रह कायम ठेवला. त्यातून निवडणूक जाहीर होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाबरोबर मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री पवार यांनीही महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची (अजित पवार) सत्ता आणण्यासाठी सर्वस्व पणाला लावणार असल्याचे जाहीर केले. त्यानुसार त्यांनी भाजपमधील नाराज माजी नगरसेवकांवर जाळे टाकण्यास सुरुवात केली. भाजपच्या स्थायी समितीच्या माजी अध्यक्षांसह दोन नगरसेविकांना पक्षात घेतले. आणखी भाजपचे काही माजी नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटेवर आहेत. पवार यांनी इच्छुकांच्या मुलाखती घेऊन उमेदवार अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू केली. दोन दिवसांत उमेदवार जाहीर केले जाणार असल्याचे या पक्षाकडून सांगण्यात आले. उपमुख्यमंत्री पवारांना शह देण्यासाठी स्थानिक भाजपनेही कंबर कसली आहे. भाजपनेही अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'ला फोडाफोडीने उत्तर देण्याची तयारी सुरू केली आहे. या पक्षाच्या एका माजी महापौरांसह काही माजी नगरसेवक, पदाधिकारी भाजपात प्रवेश करण्यासाठी अनेक दिवसांपासून प्रतीक्षा करीत आहेत. येत्या दोन दिवसांत त्यांचे मुंबई येथे पक्षप्रवेश होणार आहेत. त्यामुळे माजी नगरसेवक फोडाफोडीने भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसमधील संघर्षाला सुरुवात झाल्याचे दिसून येत आहे. निवडणूक ही निवडणूक असते. त्यात मैत्रीपूर्ण काहीही नसते. सर्व सूत्र अवलंबून निवडणूक लढविली जाईल. पूर्ण ताकदीने निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षासह इतर पक्षातील इच्छुकांचे प्रवेश लवकरच होतील, असे भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### भारतीय संघाला बसला मोठा फटका

मुंबई (समर्थ गांवकरी) : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील चौथा टी-20 सामना लखनौमधील एकाना स्टेडियमवर खेळवला जाणार होता. पण लखनौमध्ये प्रचंड धुकं असल्याने हा सामना अखेरीस रद्द करण्यात आला आहे. सामन्याची नाणेफेक होण्यासाठी पंचांनी 6.30 पासून 9.25 पर्यंत वाट पाहिली, पण हवामानामध्ये कोणताही बदल नसल्याने अखेरीस सामना रद्द झाला. पण हा सामना रद्द झाल्याचा फटका टीम इंडियाला बसला आहे. भारतीय संघाने 5 सामन्यांच्या टी-20 मालिकेतील आतापर्यंत झालेले 3 सामन्यांपैकी 2 सामने जिंकले आहेत आणि मालिका 2-1 अशी बरोबरीत आहे. चौथा सामना लखनौमध्ये खेळवला जाणार होता. 6.30 वाजता सामन्याची नाणेफेक होणार होती. पण धुकं असल्याने नाणेफेकीला विलंब झाला. यानंतर 7.45 ला पहिल्यांदा निरीक्षण केलं गेलं, यानंतर 8, 8.30, 9 वाजता निरीक्षण केलं गेलं. पण धुकं मात्र बिलकुल कमी झालं नव्हतं.

### ओतूर पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

ओतूर : (समर्थ गांवकरी) : ओतूर येथील ब्राम्हणवाडा रोडवरील संकल्प पॅराडाईजमध्ये झालेल्या घरफोडीमध्ये चोरीला गेलेला 3 लाख 87 हजार 200 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून ओतूर पोलिसांनी फिर्यादीला सुपुर्द केले आहे.यामुळे कामगिरीमुळे ओतूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. याबाबत ओतूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक एल जी थाटे यांनी माहिती दिली की 12 आगस्ट 2025 रोजी रात्रीचे दरम्यान मंदाकिनी लक्ष्मण डुंबरे यांचे ओतूर येथील रुम नं. 302, संकल्प पॅराडाईज, ब्राम्हणवाडा रोड या फ्लॅटमध्ये घरातील सर्व झोपलेले असताना हॉलच्या खिडकीच्या दरवाजातुन आत जाऊन अज्ञात चोरटयाने त्यांचे 3 तोळे 8 ग्रॅम वजनाचे मणी मंगळसुत्र, पोको कंपनिचा मोबाईल व पितळेची गायीची मुर्ती चोरी करुन चोरुन नेली असल्याची तक्रार दाखल केली होती. या गुन्ह्याचा तपास पोलिस हवालदार बाळशिराम भवारी यांच्याकडे देण्यात आला होता.

### अमली पदार्थ जप्त

पुणे : (समर्थ गांवकरी) :नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी पिंपरीमध्ये एका सदनिकेवर छापा टाकून हायड्रोपोनिक गांजा जप्त केला. सदनिकेत हायड्रोपोनिक गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणात अटक केलेल्या आरोपींकडून मिळालेल्या माहितीनंतर पथकाने पुणे, पिंपरीसह मुंबई, गोव्यात कारवाई केली आहे. पोलिसांनी विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत मेफेड्रोन, ओझीकुश (हायड्रोपोनिक गांजा), चरस, एलएसडीसह वेगवेगळ्या प्रकारचे साडेतीन कोटींचे अमली पदार्थ जप्त केले.




## • शोकाकुल :

**डॉ. विश्वासराव आरोटे**
राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई
संपादक: दैनिक समर्थ गांवकरी

**मा. नवनाथ जाधव**
कार्य. संपादक, समर्थ गांवकरी प्रदेश
प्रसिध्दी प्रमुख, म.रा.प.संघ, मुंबई

**मा. दशरथ चव्हाण**
संपादक, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष,
म.रा.प.संघ, मुंबई

**मा. संजय फुलसुंदर**
व्यवस्थापक, दै. समर्थ गांवकरी

# शेतकऱ्यांच्या हद्दीतून विनापरवानगी विजेचे पोल

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील गायरान जमीन सौर ऊर्जा प्रकल्पासाठी ५१ एकर जमीन आवादा कंपनीला १ रुपये भाड्याने देण्यात आल्यानंतर सौरऊर्जा प्रकल्प पुन्हा एकदा वादाच्या भोवरात सापडला आहे. टाकळी ढोकेश्वर येथील शेतक-यांच्या हद्दीतुन विनापरवाना सौर उर्जा प्रकल्पाच्या ठेकेदाराकडुन विजेचे पोल उभे केले जात असून सौर उर्जा प्रकल्पाचे काम आवादा कंपनी मार्फत सुरू आहे. आवादा कंपनीने SM इंटरनॅशनल कंपनीला पोल उभे करून लाईन ओढण्याचे काम (टेंडर) दिलेले आहे. या कंपनी मार्फत अनाधिकृत पणे तसेच दडपशाही पध्दतीने व शेतक-यांवर अन्याय करुन व कुठल्याही प्रकारची शेतकऱ्यांकडून परवानगी घेतलेली नाही तसेच कुठल्याही प्रकारचा मोबदला शेतकऱ्यांना



दिलेला नाही तरीदेखील या कंपनीच्या माध्यमातून मजुरांकडून पोल उभे करून तारा ओढण्याचे काम चालु आहे. या कामाचा काही शेतकरी विरोध करायला गेल्यानंतर त्या ठिकाणी त्यांना संबंधित ठेकेदार यांच्याकडून दमबाजी ची भाषा करण्यात आली. त्या संदर्भात सर्व शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केलेली आहे या तक्रारीमध्ये शेतकऱ्यांनी संबंधित ठेकेदार व कंपनी व कंपनीचे कर्मचारी यांची तात्काळ चौकशी करावी व संबंधित शेतकरी यांच्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही यासाठी सदर काम त्वरीत स्थगित करण्याचे आदेश आपण देऊन समस्त शेतक-यांना न्याय मिळवुन द्यावा अशी विनंती जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे केलेली आहे यावेळी बाबासाहेब सखाराम झावरे,श्रावण गायकवाड, पोपट हरिश्चंद्र वाघचौरे, देविदास आल्हाट, अंकुश पायमोडे, मुळीभाऊ रांधवण,संदीप आल्हाट, विनोद किसन गायकवाड , हे उपस्थित होते,

या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी ग्रामपंचायत पदाधिकारांनी व ग्रामविकास अधिकारांनी बोगस ग्रामसभा व बोगस ठराव करत आवादा कंपनीला गावची गायरान जमीन कंपनीच्या घशात घातली

> जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदन दिलेले असून या कंपनीचे ठेकेदार तसेच कंपनीचे कर्मचारी यांच्या कारवाई झाली नाही तर येत्या काही दिवसात कंपनीच्या विरोधात न्यायालयात दाद मागणार.
> **- बाबासाहेब सखाराम झावरे**

असल्याचा आरोप टाकळी ढोकेश्वर गावातील ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ करत असून या प्रकल्पाला सर्व स्तरावरून विरोध होत असताना शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीतून कोणतीही परवानगी न घेता पोल व उभे करून तारा ओढण्याचे काम होत आहे तरी जिल्हाधिकारी साहेब यांनी हे काम त्वरित बंद करावे व संबंधित ठेकेदार व कंपनीचे अधिकारी यांना योग्य ती समज द्यावी अशी मागणी संबंधित शेतकऱ्यांकडून होत आहे .

# पुण्यातील सर्वात मोठे ख्रिसमस सेलिब्रेशन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

फिनिक्स मार्केटसिटी पुणे येथे सणासुदीचा आनंद दुप्पटीने वाढवण्यासाठी मॉलमध्ये नटक्रॅकर्स, मंत्रमुग्ध करणारे संगीतात्मक थीम्स ने सजलेल्या भव्य ख्रिसमस ट्रीसह सजावट करण्यात आली आहे, जी संपूर्ण वातावरणाला उत्साही आणि आनंददायी सणाचा अनुभव देते.



मॉलचे लिबर्टी स्क्वेअर 'फिनिक्स ख्रिसमस वंडरलँड 2.0' मध्ये रूपांतरित झाले असून, झगमगत्या इमर्सिव्ह टनेलमधून प्रवेश करताच आपले स्वागत रंगीबेरंगी आणि उत्साही दुनियेत होते. येथे कँडीने सजवलेले ख्रिसमस ट्री, युरोपियन थीमवरील शॅलेट्स तसेच आकर्षक भेटवस्तू, ख्रिसमस ट्रीट्स आणि कलेक्टिबल्स देणारे फेस्टिव्ह स्टॉल्स अनुभवायला मिळतील. यासोबतच पुण्यातील सर्वात उंच टेडी बेअर यासारख्या इन्स्टा-फोटोसाठी इंस्टॉलेशन्सही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतील. या वर्षातील प्रमुख आकर्षण म्हणजे फिनलंडहून आलेला सांता, ज्याशी आपल्याला संवाद साधण्याची व अविस्मरणीय छायाचित्रे टिपण्याची संधी मिळणार आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय आणि अस्सल ख्रिसमसचा अनुभव मिळतो. वंडरलँडमध्ये लाईव्ह म्युझिक, कॅरोल सिंगिंग आणि नियोजित सादरीकरणांसह एक भव्य फेस्टिव्ह परफॉर्मन्स स्टेजही असणार असून, संध्याकापासून उत्साहपूर्ण वातावरण निर्माण होईल. कुटुंब आणि लहान मुलांसाठी टाइम झोन, फन सिटी, आणि हॅम्लीज यांसारखे गेमिंग व क्रिएटिव्ह ॲरक्टिव्हिटी झोन्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत, जे कार्यक्रमात उत्साह निर्माण करतात. याशिवाय थीम्ड मॅस्कॉट्स, कॅरिकेचर आर्टिस्ट्स आणि टॅटू आर्ट स्टेशन्स यांसारखी अतिरिक्त आकर्षणे सर्व वयोगटातील लोकांसाठी मनोरंजनाची हमी देतात.

# विभागस्तरीय स्पर्धेसाठी कुमशेत शाळेतील मुख्याध्यापक घोडे व उपशिक्षक लोलापोड निवड

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत ही द्विशिक्षकी शाळा असूनही येथील शिक्षकांनी आपल्या गुणवत्ता, सातत्य व शैक्षणिक बांधिलकीच्या बळावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित जुन्नर तालुकास्तरीय शैक्षणिक स्पर्धांमध्ये शाळेतील दोन्ही शिक्षकांनी प्रथम क्रमांक पटकावून विभागस्तरीय स्पर्धेसाठी मानाची पात्रता मिळवली आहे. या स्पर्धांमध्ये मुख्याध्यापक कवी यशवंत मारुती घोडे यांनी पुस्तक परीक्षण या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून आपली वैचारिक व समीक्षात्मक क्षमता सिद्ध केली . उपशिक्षक श्याम नागनाथ लोलापोड यांनी



शब्दकोडे सोडवणे या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून बौद्धिक चातुर्याची चमक दाखवली. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून राज्यातील शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक, बौद्धिक, भाषिक व सादरीकरण कौशल्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने नोव्हेंबर महिन्यात या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले .या घवघवीत यशाबद्दल शाळेत , जुन्नर तालुका गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, सावरगाव बीट शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू धोंडगे, केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे यांच्यासह कुमशेत ग्रामपंचायतचे सरपंच, सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, पालक, ग्रामस्थ तसेच शिरोली (बु.) केंद्रातील शिक्षक बंधू-भगिनी व व पंचायत समिती जुन्नर सर्व विषयतज्ञ यांनी उपस्थित राहून दोन्ही शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले .

# सौ. इंदरबाई कल्याण यांचे निधन

**नायगाव: (समर्थ गांवकरी)**



नायगाव (वा) येथील ज्येष्ठ महिला सौ. इंदरबाई शंकरराव कल्याण यांचे त्यांचे राहते घरी मंगळवार दि. १६ डिसेंबर रोजी सायंकाळी ठिक ५:२० वाजता वृधाक्याने वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले आहे.त्यांच्या पार्थिवावर नायगाव शहरातील पारंपरिक कल्याण स्मशानभूमी येथे बुधवार दि. १७ डिसेंबर रोजी दुपारी ठिक २:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक आप्तेष्ट यांची मोठी गर्दी होती त्यांच्या पश्चात पती, दिर, जावा, तीन मुले एक मुलगी,सुना नातू असा परिवार असून त्या प्रा. गुरुनाथ कल्याण, रघुनाथ कल्याण मुख्याध्यापक एकनाथ कल्याण यांच्या मातोश्री होत.

# एचडीएफसी बँके तर्फे देशभरांत ४००० हून अधिक सायबर फ्रॉड जागरुकतेसाठी कार्यशाळांचे आयोजन

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे त्यांच्या डिजिटल बँकिंग जागरुकता मोहिमचा एक भाग म्हणून संपूर्ण भारतात सायबर गुन्हेगारी विषयी जागरुकता कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. एप्रिल २०२५ पासून बँके तर्फे ४००० कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असून या माध्यमातून २७००० नागरिकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग विषयी शिक्षण देण्यात आले.

या कार्यशाळांच्या माध्यमातून शाळा आणि कॉलेजातील विद्यार्थी, वरिष्ठ नागरीक, स्वयंसहायता गट, ग्राहक आणि कर्मचाऱ्यांना शिक्षण देण्यात येते. या संभाषणात्मक अशा कार्यक्रमाच्या



माध्यमातून सहभागी लोकांना सुरक्षित डिजिटल बँकिंगच्या पध्दतींसह कशा प्रकारे सायबर गुन्ह्यांपासून वाचण्याच्या पध्दतीं विषयी माहिती देण्यात आली. या कार्यशाळांमध्ये खरी उदाहरणे, गोष्टी आणि व्हिडिओजच्या माध्यमातून सहभागी लोकांना गुन्हेगारांची कार्यपध्दती आणि त्यांच्यापासून बचाव करण्याच्या टिप्स सुध्दा देण्यात आल्या. यातील काही कार्यशाळांचे आयोजन हे लॉ एन्फोर्समेंट एजन्सीज (एलईएज)च्या सहकार्याने करण्यात आले होते.

गुन्हेगारांच्या पध्दतींना ओळखणे : या सत्रामध्ये कशा प्रकारे गुन्हेगार पिडीत लोकांना भिती, घाई, लालच किंवा मदतीची याचना करतात हे समजावले. यावेळी डिजिटल अरेस्ट, इन्व्हेस्टमेंट स्कॅम, एपीके फ्रॉड्स, फिशिंग, स्मिशिंग, व्हिशिंग, सीम स्वॅप, रिमोट ॲक्सेस स्कॅम, यूपीआय फ्रॉड्स इत्यादीं विषयी च्या गोष्टी आणि प्रत्यक्ष घटनांबद्दलची माहिती देण्यात आली.

सुरक्षित बँकिंग साठी प्रत्यक्ष टिप्स : या कार्यशाळांमध्ये सुरक्षित बँकिंग करण्याचे महत्त्व अधोरेखित करुन ते कसे आचरणात आणावे, व्हिजिल आंटी सारख्या जागरुकता ॲम्बेसेडर आणि कशा प्रकारे सोप्या टिप्स वापरुन ग्राहकांनी स्वत:ला सुरक्षित ठेवण्यासाठीची माहिती देण्यात आली. गुन्हेगारीला बळी पडू नये यासाठी मार्गदर्शक तत्वे: योवळी उपस्थितांना कशा प्रकारे महत्त्वाची संवेदनशील माहिती देऊ नये, कधीही संशयास्पद लिंक्स वर क्लिक करु नये आणि कशा प्रकारे एसएमएस, ईमेल किंवा व्हॉट्सॲप वरुन ॲटेचमेंट सह आलेल्या एपीके फाईल्स विशेषकरुन सरकारी अधिकारी, बँका आणि अन्य संस्थां कडून आलेल्या फाईल्स डाऊनलोड करु नयेत या विषयी माहिती देण्यात आली.

# पारनेर तालुक्यात अवैध वाळू उपसा जोरात

## महसूल प्रशासनाचे कानावर हात व तोंडावर बोट

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यात मुळा नदीपात्रातून व मांडओहोळ नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा जोरात सुरू आहे . दररोज प्रशासनाच्या नाकावर टिच्चून वाळू वाहतूक करणाऱ्या वाळू तस्कर याकडे पारनेर महसूल विभागाकडून दुर्लक्ष होत आहे . हा उपसा तातडीने थांबवावा हो संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी संबंधित गावातील ग्रामस्थांकडून होत आहे . टाकळी ढोकेश्वर, परिसरातील वासुंदे चौकातून व मांडओहोळ फाटा येथून खुलेआम वाळू वाहतूक सुरू आहे . पोखरी , देसवडे , मांडवे , पळशी , तास , वनकुटे परिसरातील मुळा नदी पात्रात व मांडओहोळ धरणावरील नदीपात्रात गेल्या काही दिवसांपासून बेसुमारअवैध वाळू उपसा सुरू आहे . याकडे पारनेर महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे . पारनेर तालुक्यातील काही गावांमध्ये वाळू बंदी करावी असा आवाज उठवण्यात गेल्यास त्यांना जिवे मारण्याची धमकी किंवा दमबाजी केली जाते

सततच्या वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे परिसरातील रस्त्यांचीही अवस्था अत्यंत दयनीय होत आहे . त्यामुळे स्थानिकांनाही खड्डयांच्या रस्त्यांमधून वाट शोधावी लागत आहे . वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रस्ते दुरुस्त केल्यानंतरही तत्काळ खराब होतात . त्यामुळे वाहन चालक व स्थानिक नागरिकांचे हाल होत आहेत .

त्यामुळे पारनेर महसूल प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे



व बेकायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी मागणी संबंधित गावातील लोकांमधून होत आहे.

नदीपात्रातून वाळू वाहतूक केल्यानंतर वाळू धुण्यासाठी काही आड्डे आहेत ते अगदी रस्त्याच्या कडेला असूनही कोणत्याही अधिकाऱ्याला ते दिसत नाही हे नवलच.

पारनेर तालुक्यात वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरवर कुठल्याही प्रकारची नंबर प्लेट नसतानादेखील सर्रास वाळू वाहतूक केली जाते याकडे आरटीओचे दुर्लक्ष का.?

सदर मुळा नदी पात्र व मांडओहोळ नदीपात्रातून सर्रास वाळू उपसा होत असताना कुणीही अधिकारी कारवाई करताना या ठिकाणी दिसत नाही ही वाळू वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने होत आहे यात काही देवाण-घेवाण तर नाही ना ?असा सवाल तालुक्यातील सामान्य लोकांना पडला आहे.

# तरुणाईचा वेळ कुठे खर्च होतोय?

**मुखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

आजच्या बदलत्या काळात समाजातील तरुणाई कोणत्या दिशेने चालली आहे, हा प्रश्न गंभीरपणे विचारात घेण्याची वेळ आली आहे. कल्याणच्या सराफ बाजारापासून मुंबई–ठाणे परिसरापर्यंत पाहिले तर एक ठळक चित्र दिसते. गुजराती व मारवाडी समाजातील १८ ते २८ वयोगटातील तरुण पहाटेपासून आपल्या वडिलांच्या दुकानात काम करताना दिसतात. झाडू मारणे, लादी पुसणे, ग्राहकांशी बोलणे, हिशोब समजून घेणे—या सगळ्यातून ते लहान वयातच उद्योग, शिस्त आणि जबाबदारी शिकत असतात. हाच अनुभव पुढे त्यांना सक्षम व्यापारी बनवतो. याउलट, आपल्या समाजातील (विशेषतः ब्राह्मणेतर) १५ ते २७ वयोगटातील अनेक मराठी तरुण मोठ्या प्रमाणात देवांच्या पालख्यांमध्ये आठवडे-आठवडे पदयात्रा करताना दिसतात.

# गणित प्रदर्शनात ढोकेश्वर विद्यालयाची गरुडझेप




**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

राळेगण सिद्धि येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान - गणित प्रदर्शना मध्ये श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील दोन उपकरणांची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. पारनेर तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या श्री ढोकेश्वर विद्यालय टाकळी ढोकेश्वर या विद्यालयातील इ ५ वी मध्ये शिकणाऱ्या कु. भक्ती सचिन खैरे व कु. वैष्णवी राजु ठुबे यांनी १ ते ५ या गटात प्रथम क्रमांक मिळवला व इ . ५ वी मधे शिकणारा चि. रोनित सुमित कटारीया याने ६ ते ८ या गटामधे द्वितीय क्रमांक मिळविला. जेष्ठ समाजसेवक पद्मभूषण आण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील विज्ञान विषय शिक्षिका श्रीम. सोनल रोहोकले मॅडम , वैशाली गायखे मॅडम , जेष्ठ शिक्षक मल्हारी वाघस्कर सर, श्रीरंग धामणे, अतुल सैद, मीनाक्षी पवार, सोनाली माळवदे तसेच सर्व गणित विज्ञान शिकविणाऱ्या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले . या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त श्री. सितारामजी खिलारी सर तसेच कार्यकारीणी सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी सर , पर्यवेक्षिका श्रीम. गाडगे मॅडम यांनी अभिनंदन केले.


## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१३१/२०२५ अकोले दि. १७/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. सविता श्रीकांत गायकवाड, रा.वाघापुर,** ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांची मुलगी अंतरा श्रीकांत गायकवाड हिचा जन्म दि. १४/१२/२०१८ रोजी वाघापुर** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **वाघापुर**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. सविता श्रीकांत गायकवाड, रा.वाघापुर,** ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांची मुलगी अंतरा श्रीकांत गायकवाड हिचा जन्म दि. १४/१२/२०१८ रोजी वाघापुर** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **वाघापुर**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/१२/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**


# सौ. स्नेहलता पुनमचंद सोमानी यांच्या स्मृती दिनानिमित्त दीप प्रज्वलित

## आपत्कालीन सेवेसाठी आर्थिक मदत व वृद्धाश्रमात भोजनदान!

**वाशिम : (समर्थ गांवकरी)**

वैकुंठधामवासी सौ. स्नेहलता पुनमचंद सोमानी यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त सोमानी परिवाराने केवळ श्रद्धांजलीपुरते न थांबता, समाजाला उपयोगी पडणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्या स्मृतींना चिरंतन स्वरूप दिले. सेवा हाच खरा स्मरणाचा मार्ग या भावनेतून राबविण्यात आलेले हे उपक्रम समाजात संवेदनशीलतेचा आदर्श ठरत आहेत.

दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी स्मृती दिनानिमित्त सोमानी परिवारातर्फे सर्वधर्म मित्र मंडळ संचलित "वन सेकंद – वन कॉल – न्यू लाईफ" अभियान तसेच SAS कंट्रोल रूम यांच्या सामाजिक कार्यासाठी ₹ ११,०००/- (अकरा हजार रुपये) इतकी सन्मानपूर्वक आर्थिक मदत देण्यात आली. ही मदत श्री. निलेशभाऊ सोमाणी यांच्या हस्ते श्याम सवाई (अध्यक्ष – सर्वधर्म मित्र मंडळ SAS कंट्रोल रूम) यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

आपत्कालीन सेवेला बळ : "वन सेकंद – वन कॉल – न्यू लाईफ" हे अभियान अपघात, आजारपण, रक्ताची गरज, रुग्णवाहिका, तसेच अन्य आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तत्काळ मदत मिळावी, या उद्देशाने कार्यरत आहे. SAS कंट्रोल रूमच्या माध्यमातून २४ तास सेवा देण्याचे काम सुरू असून, सोमानी परिवाराच्या या योगदानामुळे या सेवेला आर्थिक व नैतिक बळ मिळाले आहे. या मदतीमुळे गरजू रुग्ण, अपघातग्रस्त नागरिक व संकटात सापडलेल्या कुटुंबांना वेळेत मदत मिळण्यास हातभार लागणार आहे.

यावेळी श्याम सवाई यांनी बोलताना सांगितले की, "सौ. स्नेहलता सोमानी यांच्या स्मृती दिनानिमित्त दिलेली ही मदत समाजासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, अशा संवेदनशील कुटुंबांमुळेच समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक होत आहे."

वृद्धाश्रमात 'आपले हक्काचे घर' या भावनेतून भोजनदान : स्मृती दिनानिमित्त सोमानी परिवाराने आणखी एक हृदयस्पर्शी उपक्रम राबवित गंगोत्री वृद्धाश्रम



येथे भोजनदान सेवा आयोजित केली. "आपले हक्काचे घर" या संकल्पनेतून वृद्धांना सन्मान, माया व आपुलकी देणाऱ्या या सेवेमुळे आश्रमातील ज्येष्ठ नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी वृद्धाश्रमाचे श्री. एस. जी. गाजरे (संचालक) व सौ. अर्चना गाजरे (संचालिका) यांनी सोमानी परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले. "वृद्धांसाठी प्रेमाने केलेले अन्नदान हे केवळ भोजन नसून, त्यामागे असलेली भावना आमच्यासाठी अमूल्य आहे," असे त्यांनी नमूद केले.

गंगोत्री वृद्धाश्रम पत्ता: रिसोड–साखरा रोड, केलसुला, ता. सेनगाव.

समाजासाठी प्रेरणादायी आदर्श : श्री. निलेश सोमाणी, सौ. भारती सोमाणी, तेजस सोमाणी, कु. पूर्वा सोमाणी व समस्त सोमानी परिवार (वाशिम) यांनी एकत्र येऊन राबविलेल्या या उपक्रमांमुळे स्मृती दिनाला सामाजिक अधिष्ठान लाभले आहे. वैयक्तिक दुःखातून समाजोपयोगी कार्याची वाट निवडणे हा खऱ्या अर्थाने मानवी मूल्यांचा गौरव असल्याचे नागरिकांनी यावेळी बोलून दाखविले.

कृतज्ञतेची भावना : सर्वधर्म मित्र मंडळ व SAS कंट्रोल रूमतर्फे सोमानी परिवाराचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. सेवा, करुणा आणि सामाजिक बांधिलकी यांचे उत्तम उदाहरण म्हणून हा स्मृती दिन उपक्रम समाजात दीर्घकाळ प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सौ. स्नेहलता पुनमचंद सोमानी यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त राबविण्यात आलेले हे सामाजिक उपक्रम केवळ श्रद्धांजली न राहता, गरजूंच्या जीवनात दिलासा देणारे ठरले असून, समाजासाठी आदर्श निर्माण करणारे आहेत.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# बनावट सोने देण्याच्या बहाण्याने आलेल्या टोळीस जेरबंद

- जामखेड पोलीसांची सरवौतम कामगिरी. या आगोदर ही जामखेड पोलीस स्टेशन ने घरफोडी करनारी टोळी गजाआड केली आहे.
- फरारी आरोपी गजाआड केले आहेत.. चढता आलेख आहे.




**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

नाशिक येथे खोदकाम करताना सोन्याचे मनी सापडले आसुन तुम्ही सर्व मनी आठ लाख रुपयांना विकत घ्या अशी गळ कापड व्यापाऱ्यास आरोपींनी घातली. मात्र प्रसंगावधान राखून व्यापाऱ्याने याची माहिती जामखेड पोलीसांना दिली. यानंतर जामखेड पोलीसांनी खर्डा रोडवर सापाळ रचुन बनावट सोने देण्याच्या बहाण्याने आलेल्या आंतरराज्यीय टोळीस जेरबंद केले.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की जामखेड शहरातील प्रसिध्द कापड दुकाणदार गणेश महादेव खेत्रे रा. जामखेड यांना त्यांच्या कापड दुकामध्ये दि. 28 नोव्हेंबर 2025 रोजी आरोपी अशोक मिस्त्री (उत्तमकुमार मोकाराम बागरी) वय २४ वर्ष रा.धानसा ता.भिनमाल राज्य राजस्थान याने त्याचे सोबत असलेला आरोपी मोहनलाल बालाजी बागरी वय ५६ वर्ष रा.धानसा ता.भिनमाल राज्य राजस्थान यांनी फिर्यादी यांचे क्रिएटीव्ह मेन्स वेअर नावाचे कापड दुकाणात येवून काही कपडे खरेदी करून एका पिवळया धातूच्या माळेतील एक मनी फिर्यादी यांना देवून सांगितले की, नाशिक या ठिकाणी खोदकाम करताना हे आम्हाला मिळून आले आहे. तुम्ही सोनाराकडे जावून हे सोने आहे का याची खात्री करा व आम्हाला पैशाची गरजअसल्याने आठ लाख रूपयामध्ये आमच्याकड़ील सर्व माल विकत घ्या, आरोपी वेळोवेळी त्यांच्या कडील बनावट सोने फिर्यादी यांना विकण्यासाठी फिर्यादीचे मोबाईलवर आरोपीकडील मोबाईल वसरून संपर्क करत होते. गुन्हयातील आरोपीनी दिनांक 15 डीसेंबर रोजी रोजी दुपारी पावनेतीन वाजता जामखेड कडून खर्ड्याकडे जाणाऱ्या रोडवरून रंगोली हॉटेलच्या जवळ थांबून फिर्यादीस ठरलेली रक्कम घेवून बोलावले होते.

सदर बनावट सोन्याची जामखेड पोलीस स्टेशन हद्दीत विक्री करून फसवणूक होणार असल्याची माहीती गुप्त बातमीदारा मार्फत जामखेड पोलीसांना मिळाली होती. मिळालेल्या बातमी नुसार गुन्हा घडण्यापुर्वीच पोलीस निरीक्षाक यांचे आदेशान्वये जामखेड पोलीस स्टेशन येथील पोलीस पथक खर्डारोड परिसरात पेट्रोलिंग करत होते. त्याचवेळी हॉटेल रंगोली या ठिकारणी फिर्यादी, त्यांचा भाऊ व मित्र असे चारचाकी वाहनातून गेल्यानंतर आरोपींनी फिर्यादीस त्यांचे कडील बनावट सोने देवून, पैशाची मागणी केली त्याचवेळी फीर्यादी यांनी हे सोने नसून बनावट सोन्याचे दागिणे आहेत असे म्हणताच 1) अशोक मिस्त्री (उत्तमकुमार मोकाराम बागरी) वय 24 वर्ष रा. धानसा ता. भिनमाल राज्य राजस्थान 2) प्रविणकुमार मोहनलाल बागरी वय 25 वर्षे रा.भिनमाल राज्य राजस्थान यांनी फिर्यादीस मारहान करून त्यांचे खिशातील रोख रक्कम तीन हजार रूपये जबरदस्तीने काढून घेतले.

# राष्ट्रीय संत सद्गुरु श्री कृष्णानंदजी महाराज यांचे मुंबई विमानतळावर भव्य स्वागत

**शहापूर : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय संत सद्गुरु श्री कृष्णानंदजी महाराज यांचे काल मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले. भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विमानतळ परिसरात "सद्गुरु श्री कृष्णानंदजी महाराज की जय" च्या जयघोषाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

या प्रसंगी सद्दीप्र समाज सेवा समिती व सद्गुरु धाम आश्रम समितीच्या वतीने सद्गुरु धाम आश्रमाचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रीय संत सद्गुरु श्री कृष्णानंदजी महाराज यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी आचार्य जनेश्वर स्वामी, सौ. आचलिका गुप्ता, मनीष गोस्वामी, आचार्य जयंत तायडे, भैरवसिंह शेखावत, उपेंद्र शुक्ला, नरेंद्र बडनखे, आनंद यादव, चंद्रकांत पाटील,



कैलासनाथ यांच्यासह उपस्थित सर्व सेवाधारी गणांनी सद्गुरु महाराजांचे स्वागत करून त्यांचे आशीर्वाद घेतले. दिनांक १५ ते ३१ डिसेंबर दरम्यान वरलीपाडा येथे असलेल्या सद्गुरु धाम आश्रमात विविध आध्यात्मिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये रामनाम कीर्तन, गुरुदेव आशीर्वादपर कार्यक्रम, स्मरण साधना, ब्रह्मदीक्षा, दिव्य गुप्त विज्ञान, दररोज नित्य कार्यक्रम, ध्यान साधना, सत्संग प्रवचन, महायज्ञ व महाप्रसाद यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमांच्या निमित्ताने सद्गुरु श्री कृष्णानंदजी महाराज महाराष्ट्रात आल्याने भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

# ३ दिवसांच्या नवजात बाळाचे वाचले प्राण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील डॉक्टरांनी इंटेस्टाइनल मॅलरोटेशन विथ मिडगट व्हॉल्व्युलस या दुर्मिळ आणि जन्मजात आतड्यांच्या गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या केवळ ३ दिवसांच्या नवजात बाळावर यशस्वी उपचार केले. हा आजार वेळेत उपचार न झाल्यास काही तासांत जीवघेणा ठरू शकतो. लक्षणांची लवकर ओळख, तातडीची तपासणी आणि योग्य वेळी करण्यात आलेली शस्त्रक्रिया यामुळे बाळाचे प्राण वाचवणे शक्य झाले.



हे बाळ मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथेच जन्माला आले होते आणि सुरुवातीला त्याची प्रकृती स्थिर होती. मात्र दुसऱ्या दिवशी बाळाला दूध पिण्यात अडचण येऊ लागली आणि प्रत्येक फीडनंतर उलट्या होऊ लागल्या. ही धोक्याची चिन्हे ओळखताच बालरोग तज्ज्ञांच्या पथकाने तातडीने सखोल तपासण्या सुरू केल्या. या प्रकरणाबाबत माहिती देताना डॉ. परितोषा दलाल, सल्लागार – बालरोग व नवजात शल्यचिकीत्सक, मणिपाल हॉस्पिटल, बाणेर म्हणाल्या, " ही अवस्था म्हणजे शस्त्रक्रियेची तातडीची गरज असलेली आपत्कालीन परिस्थिती आहे. बाळाची तत्काळ तपासणी करण्यात आली आणि तातडीची पोटाची सोनोग्राफी तसेच इतर उच्चस्तरीय तपासण्या केल्या. त्यामध्ये लहान आतड्याच्या सुरुवातीच्या भागात अडथळा निर्माण करणारा इंटेस्टाइनल मॅलरोटेशन विथ मिडगट व्हॉल्व्युलस हा आजार असल्याचे स्पष्ट झाले.

या स्थितीत चुकीच्या पद्धतीने बसलेली आतडी स्वतःच्या रक्तपुरवठ्याभोवती (सुपीरियर मेसेन्टेरिक आर्टरी) वळतात, ज्यामुळे आतड्यांना जाणारा रक्तपुरवठा थांबण्याचा आणि आतडी सडण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे बाळाला तातडीने शस्त्रक्रियेसाठी नेण्यात आले."

# जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची भेट

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

चिखली तालुकाअंतर्गत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्र चांडोळ व प्राथमिक आरोग्य केंद्र शेळगाव आटोळ येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी मंगळवारी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान डॉ. गिते यांनी दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रामधील ऑपरेशन थिएटर (शस्त्रक्रिया कक्ष), डिलिव्हरी रूम, वॉर्ड, लसीकरण कक्ष आदी विभागांची सविस्तर तपासणी करून संपूर्ण कामकाजाचा आढावा घेतला. तसेच कुटुंब कल्याण, एनसीडी, निक्षय, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करत डेटा एन्ट्री वेळेत व अचूक करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सध्या सुरु असलेल्या सिकलसेल सप्ताह प्रभावीपणे राबविण्याबाबत सुचनाही दिल्या.

# सहकार भारतीचे राष्ट्रीय संयोजक अनंतकुमार मिश्रा यांचा पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्यावतीने सत्कार

- पतसंस्थां व बँकांनी स्वदेशीचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे- अनंतकुमार मिश्रा



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

विणकर कारागिरांनी वस्त्रोद्योग निर्मितीत सुबक व आकर्षक पद्धतीने काम करून चांगला नावलौकिक मिळविला आहे. बनारसी साडी, कांजीवरम साडी या सुंदर कारागिरी व कलाकुसरीमूळे जगभर प्रसिद्ध आहेत.

देशातील सरकार स्वदेशीचा व्यवसाय करणाऱ्या स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देत आहे. सहकार क्षेत्राच्या चळवळीमुळे महाराष्ट्राची प्रगती होत आहे. सहकाराच्या माध्यमातून मोठ्या पतसंस्थांचे जाळे निर्माण झाले आहे. पतसंस्थांच्या माध्यमातून लघुउद्योगांना आर्थिक सहाय्य उपलब्ध होते.पतसंस्थांनी व बँकांनी स्वदेशीचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे व प्रोत्साहन द्यावे.असे प्रतिपादन सहकार भारतीचे राष्ट्रीय संयोजक अनंत कुमार मिश्रा यांनी केले आहे.

सहकार भारतीचे राष्ट्रीय संयोजक अनंत कुमार मिश्रा यांनी पंडित दीनदयाळ पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच जैन ओसवाल नागरी पतसंस्थेचे नवनिर्वाचित चेअरमन अभय पितळे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्रमुख उपस्थितीत पंडित दीनदयाळ नागरी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे, संचालक अनंत होशिंग, बाबासाहेब साठे,संतोष गांधी, मर्चंट बँकेचे संचालक किशोर गांधी,पद्मशाली समाजाचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी, उद्योजक विनोद गुंडू,उमेश मेरगु,सोलापूर सहकार भारतीचे सह संघटक सूर्यकांत पाटील, देवेंद्र यादव,पंढरपूरचे महामंत्री शिवानंद बोरमणी, हरियाली चे सुरेश खामकर, उज्वला भांगे, ज्ञानेश्वर भांगे, दीपक रोहोकले, अजिंक्य गुरावे, व्यवस्थापक निलेश लाटे, उपव्यवस्थापक सुखदेव दरेकर आदी उपस्थित होते.

# इंडियन, इंस्टिूट्यट, इंटीरियर, डिज़ाइनर आयोजित बॉक्स क्रिकेट स्पर्धा संपन्न

- आय आय आय डी बॉक्स क्रिकेटचे विजेते पद वर्धमान सुपर स्ट्रायकर यांनी पटकावले




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

इंडियन इंस्टिूट्यट इंटीरियर डिज़ाइनर या संस्थेनी बॉक्स क्रिकेट स्पर्धा आयोजित केली होती.तीन दिवस चालणाऱ्या सामन्या मधे एकूण १२ संघानी सहभाग घेतला होता. या संघा मधे फक्त इंटीरियर डिजाइनर,आर्किटेक्ट अशा एकूण १२५ सभासदांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन आर्किटेक्ट गणेश वाबळे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी ऐसा असोसिएशन चे अध्यक्ष अभिजीत देवी,आय आय ए चे अध्यक्ष प्रल्हाद जोशी,आय डी ए चे अध्यक्ष सागर कंदूर ,प्रदीप तांदळे व अवतार सिंग हिरा हे मान्यवर उपस्थित होते.या सर्वाचे चे स्वागत व प्रस्ताविक आय आय आय डी चे चेअरमन इंटीरियर डिझायनर सूरज नन्नवरे यानी केले. याप्रसंगी नविन वर्षा चे २०२६ चे डायरी व कैलेंडर यांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सलग तीन दिवस चालणाऱ्या क्रिकेट च्या सामन्यामध्ये एकूण १२ संघाचे ३३ सामने झाले. त्यामधून फाइनल फेरी घेऊन विजेता संघ निवडण्यात आला.

राजस्व टर्फ वर बक्षिस समारंभ घेण्यात आला.यावेळी प्रमुख अतिथि मा.जस्मितसिंग वधवा यांच्या हस्ते पारितोषिके वितरण करण्यात आले.

याप्रसंगी माजी चेअरमन अजय अपूर्वा, अमोल खोले,चंद्रकांत तागड यांची उपस्थिति होती.या सर्वांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिक देण्यात आली.यामध्ये बारा संघांमधून "वर्धमान सुपरस्ट्रायकर" हा संघ विजेता झाला.तर "वूड्स वॉरियर" संघ उपविजेता झाला.

तसेच मॅन ऑफ द सिरीज - साहिल फिरोदिया,

बेस्ट बॉलर - गुरुवीर सिंग मकर,बेस्ट बॅट्समन व सर्वाधिक षटकार पारितोषिक-करण बागवानी , सर्वाधिक चौकार पारितोषिक- साहिल ओसवाल महिलांमध्ये सर्वाधिक षटकार व चौकार-किरण जाधव यांना मिळाले.बेस्ट बॉलर-धनश्री खोले यांना मिळाले.तसेच या स्पर्धेत पंच म्हणून शुभम बुरगुल,गोपाल न्यालपेल्ली,निखिलेश मोहाडीकर,ओम बिडवे यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आय आय आय डी चे सभासद सांची जैन-बार्शीकर,परेश व्यवहारे, कुणाल पिंपळे,स्मित डुंगरवाल, तेजस तनपुरे,सम्यक मुनोत , चेतन भंडारी,धनश्री खोले, कल्पना गांधी यांनी परिश्रम घेतले.

# सैनिकी सभामंडप भाडेतत्वावर उपलब्ध

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा सैनिक कल्याण्य कार्यालयाचे सैनिकी सभामंडप हे शासकीय व इतर सामाजिक कार्यक्रमाकरीता माफक दरात भाडेतत्वावर उपलब्ध करण्यात आले आहे. नागरिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. जिल्ह्यातील सर्व नागरीकांसाठी सुविधायुक्त असलेले, सुसज्ज, भव्य आणि शहराच्या मध्यवर्ती भागामधील एस.टी. बस स्टँडपासून केवल २५ मीटर अंतरावर सर्व सोयींनी सुसज्ज असलेले जिल्हा सैनिक कल्याण्या कार्यालयाचे सैनिकी सभामंडप हे लग्न समारंभ, वाढदिवस, शासकीय व इतर सामाजिक कार्यक्रमाकरीता माफक दरात भाडेतत्वावर उपलब्ध करण्यात आले आहे.

# ठाणे महापालिका हद्दीतील अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्स हटविले

## गेल्या २४ तासात १४०४ अनधिकृत पोस्टर्सवर कारवाई

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर शहरातील अनधिकृत जाहिराती, बॅनर्स व पोस्टर्स हटविण्याची मोहीम ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत सुरू आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर शहरातील एकूण 1404 अनधिकृत पोस्टर्स व बॅनर्स हटविण्यात आले आहेत.




दिनांक 15 जानेवारी 2026 रोजी मतदान होणार असून, त्या पार्श्वभूमीवर शहरात लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यात येत आहे. निवडणूक विभागाचे उपायुक्त श्री. उमेश बिरारी यांच्या सूचनेनुसार सहायक आयुक्त सोपान भाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील 9 प्रभाग समित्यांमधील पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत अनधिकृत बॅनर्स, वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज, भित्तीपत्रके व पोस्टर्स हटविण्याची कारवाई करण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींची नावे असलेल्या विकासकामांच्या कोनशीला झाकण्याची कार्यवाही महापालिकेच्यावतीने करण्यात आली.

कारवाईचा प्रभागनिहाय तपशील - नौपाडा–कोपरी प्रभाग समिती - 204, वागळे प्रभाग - 257, लोकमान्य सावरकरनगर प्रभाग - 257, वर्तकनगर प्रभाग - 275, माजिवडा–मानपाडा प्रभाग - 107, उथळसर प्रभाग 169, कळवा प्रभाग - 21, मुंब्रा प्रभाग– 15, दिवा प्रभाग समिती - 99



ठाणे : दिव्यात शिंदे गटाला 'लाडक्या बहिणींचा' धक्का. शिंदे गटाच्या मनमानी कारभाराला कंटाळून महिला कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला. ठाकरे शिवसेनेचे सचिव वरुण सरदेसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षप्रवेश पार पडला. प्रसंगी शिंदे गटाच्या शर्मिला म्हात्रे, मनाली उगवे, वनिता देवकर, नंदा चव्हाण, भारती फडणीस, भाग्यश्री येवले, वृषाली जगताप, सपना पवार, गीता डोके, कुंदा डिके व ज्योती दळवी यांनी ठाकरे शिवसेनेत पक्षप्रवेश केला.

**(फोटो - संतोष पडवळ)**



**ठाणे :** भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा, ठाणे शहर (जिल्हा) श्री शशिकांत (सतीश ) मनोहर केळशीकर यांची ठाणे जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले, आमदार संजय केळकर व निरंजन डावखरे तसेच भाजप अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश अध्यक्ष दिलीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आले. प्रसंगी अनुसूचित जाती मोर्चा, ठाणे शहर (जिल्हा) अध्यक्ष विरसिंह पारछा यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

**( फोटो - संतोष पडवळ )**

# श्री क्षेत्र माळेगाव यात्रेला प्रारंभ; देवस्वारी-पालखी पूजन व कृषी प्रदर्शन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र माळेगाव येथील श्री खंडोबाच्या यात्रेला आजपासून देवस्वारी व पालखी पूजनाने प्रारंभ होत आहे. यानिमित्ताने शेतकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या भव्य कृषी प्रदर्शनाचे उद्घाटनही आज करण्यात येणार आहे.



आज दुपारी 2 वाजता देवस्वारी व पालखी पूजन संपन्न होणार असून, यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल मोरेश्वर सावे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. शिवाजी काळगे, खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह आमदार सतीश चव्हाण, आमदार विक्रम काळे, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार भीमराव केराम, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापुरकर, आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, आमदार श्रीजया चव्हाण, विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, माळेगावच्या सरपंच कमलबाई रुस्तुमराव धुळगंडे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

आज दुपारी 3 वाजता शेतकऱ्यांच्या हितासाठी आयोजित कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब मोहनराव पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची विशेष उपस्थिती राहणार असून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार राजेश पवार व कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे प्रमुख उपस्थितीत राहणार आहेत.

माळेगाव यात्रेच्या निमित्ताने शुक्रवार दिनांक 18 डिसेंबर रोजी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने सकाळी 10 वाजता अश्व, श्वान व कुक्कुट प्रदर्शन तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार असून, खासदार डॉ. अजित गोपछडे व आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. प्रमुख उपस्थितीत आमदार सतीश चव्हाण, आमदार विक्रम काळे, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार बालाजीराव कल्याणकर तसेच पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे उपायुक्त राजकुमार पडिले उपस्थित राहणार आहेत.

सकाळी 11 वाजता माळेगाव यात्रेत महिला व बालकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाचे उद्घाटन लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, आमदार श्रीजया चव्हाण व आमदार जितेश अंतापुरकर हेही उपस्थित राहणार आहेत. श्री खंडोबा यात्रेच्या निमित्ताने धार्मिक, सांस्कृतिक व कृषी-पशुसंवर्धन उपक्रमांमुळे माळेगाव यात्रेला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# व्यसन, न्यूनगंड ते आत्मविश्वास : महेश पाडेकर

**भंडारदरा : (समर्थ गांवकरी)**



भंडारदरा डॅम, शेंडी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आयोजित विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात मानसशास्त्र विषयाचे अभ्यासक व अनुभवी समुपदेशक महेश पाडेकर यांनी "किशोरवयीन मुलांच्या समस्या व उपाययोजना" या विषयावर प्रभावी व मार्गदर्शक व्याख्यान दिले.

किशोरवयात निर्माण होणारे मानसिक गोंधळ, न्यूनगंड, व्यसनांचे आकर्षण, मोबाईलचे व्यसन, अभ्यासातील उदासीनता, पालक–विद्यार्थी संवादातील दरी, आत्मविश्वासाचा अभाव अशा अनेक वास्तव समस्यांचा त्यांनी सखोल आणि उदाहरणांसह उलगडा केला. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत, अनुभवकथन व कृतीयुक्त उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी आत्मसन्मान, सकारात्मक विचारसरणी आणि योग्य निर्णयक्षमता कशी विकसित करावी याचे प्रभावी मार्गदर्शन केले. "किशोरवय हा आयुष्यातील अत्यंत संवेदनशील टप्पा असून योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी घडतो, अन्यथा तो भरकटतो," असे स्पष्ट मत महेश पाडेकर यांनी व्यक्त केले. व्यसनांपासून दूर राहण्यासाठी आत्मनियंत्रण, ध्येय निश्चिती आणि शिक्षक-पालकांचा संवाद किती आवश्यक आहे, हे त्यांनी ठळकपणे अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य दिलीप रोंगटे हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी अशा मार्गदर्शक व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा मिळते, असे मत व्यक्त केले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी संदीप महाडदेव व सहकार्यक्रमाधिकारी राजेंद्र चव्हाण यांनी शिबिराच्या उद्दिष्टांची माहिती देत विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा जीवनात उपयोग करावा, असे आवाहन केले.




**नगर :** अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने महाष्ट्रातील विविध जिल्हयात विशेषतः अहिल्यानगर, विदर्भ, मराठवाडयामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महापूरात तेथील सामान्य जनजिवन बाधीत झाले. तसेच मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान व जीवीत हानी झाली आहे. राज्यातील या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत झालेल्या अपतग्रस्तांना सामाजिक बांधिलकी व मानवतेच्या दृष्टीकोनातून मुख्यमंत्री सहायता निधीस बँकेच्या सेवकांनी एक दिवसाचा पगार रुपये १६.१८ लाख व बँकेच्या स्वनिधीतून ९४.८२ लाख असा १ कोटी ११ लाखाचा चेक राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व उपमुख्यमंत्री नामदार एकनाथरावजी शिंदे, जिल्हयाचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आज मुंबई येथे सुपूर्त करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...

### भारतातील पगारदार व्यक्तींसाठी डिजिप्रोटेक्ट टर्म इन्शुरन्स सादर




नवी दिल्ली (स. गांवकरी) : पीएनबी मेटलाइफ इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (पीएनबी मेटलाइफ), या भारतातील एका अग्रगण्य जीवन विमा कंपनीतर्फे पगारदार व्यक्तींसाठी पीएनबी मेटलाइफ डिजिप्रोटेक्ट टर्म प्लॅन (UIN-117N141V01) सादर करण्यात आला आहे. पॉलिसीबाजारच्या सहकार्याने पूर्णपणे डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सादर करण्यात आलेला हा वैयक्तिक, नॉन-लिंक्ड, नॉन-पार्टिसिपेटिंग असा टर्म इन्शुरन्स प्लॅन आहे. डिजिटल-फर्स्ट दृष्टिकोनामुळे या प्लॅनचा ॲक्सेस अधिक सुलभ झाला असून टियर 2 आणि टियर 3 शहरांमधील पगारदार वर्गापर्यंत जीवन विम्याची व्याप्ती वाढण्यास मदत होत आहे. या प्लॅनअंतर्गत पहिल्या वर्षासाठी पहिल्या प्रीमियमवर कमाल 21% पर्यंत सवलतीचा खास लाभ देण्यात येत असून, त्यामुळे पॉलिसीधारकांसाठी विमा संरक्षण घेण्याची सुरुवात करण्याचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होतो.

### वीरगाव शिवारातील विहिरीत आढळले दोन बालकांचे मृतदेह

अकोले (स. गांवकरी) : सोमवारी सायंकाळी तालुक्यातील वीरगाव शिवारात एका विहिरीत दोन कोवळ्या वयाचे चिमुरडे मृतावस्थेत आढळून आले. ही माहिती गावकऱ्यांना समजताच परिसरात एकच खळबळ उडाली. या विहिरीत ही दोन बालके केव्हा व कशी पडली, बालके विहिरीत कशी आढळली असे प्रश्न आता निर्माण झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच या चिमुरड्यांचे मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आले. या घटनेनंतर वीरगाव व परिसरात शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेतील मृत बालकांची नावे श्रेया पोपट मेंगाळ (वय २.६ वर्षे) व पीयूष पोपट मेंगाळ (वय ८ महिने) अशी आहेत. या दोन्ही बाळांचे वडील पोपट मेंगाळ (रा. निळवंडे) यांचा सात ते आठ महिन्यांपूर्वीच अपघातात मृत्यू झाला आहे. त्यानंतर या मुलांची आई वीरगाव येथे माहेरी राहण्यास आली. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद खांडबहाले करत आहेत. या घटनेची नोंद अकोले पोलिसांत अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली. पुढील पोलीस तपासानंतर सत्य बाहेर येईल अशी माहिती अकोले पोलिसांनी दिली.

### आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबास एक लाखाचे धनादेश

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : बिलोली तालुक्यातील भोसी येथील शेतकरी गजानन विश्वनाथ शिकारे यांनी( दि.५ )मार्च २०२५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती .दि १७डिसेंबर २०२५रोजी आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबीयास मिळणाऱ्या शासकीय मदतीच्या धनादेशाचे वाटप बिलोली तहसीलदार गजानन शिंदे यांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार दिपक मराळे यांचा हस्ते १ लाखाचे धनादेश मयत शेतकरी गजानन शिकारे यांच्या कुटुंब प्रमुख विश्वनाथ शिकारे यांना देण्यात आले. यावेळी नाम फाउंडेशन चे जिल्हा प्रसिद्दी प्रमुख भाऊराव मोरे ,मराठवाडा जनता विकास परिषद चे बिलोली तालुका अध्यक्ष इंद्रजित तुडमे , सामाजिक कार्यकर्ते सय्यद रियाज,माधव एडके,सतिष बळवंतकर, सुनिल जेठेसह तहसीलचे अव्वल कारकून दीपक पाईकराव, साईनाथ आमेटवार उपस्थित होते.

## माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांना माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींबाबत जिल्हा परिषद, ठाणे ग्रामपंचायत विभाग अंतर्गत अधिकाऱ्यांना सुस्पष्ट व अद्ययावत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद, ठाणे येथील बी. जे. हायस्कूल येथे हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले. सदर प्रशिक्षण कार्यक्रम दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणास भिवंडी, कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमास प्रकल्प संचालक पंडित राठोड, गटविकास अधिकारी भिवंडी गोविंद खामकर, सहाय्यक गटविकास अधिकारी अंबरनाथ निता खोटरे तसेच विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये यशदामार्फत तज्ज्ञ प्रशिक्षक म्हणून सूत्रसंचालक दादू बुळे, तज्ञ प्रशिक्षक (माहिती अधिकार) रेखा साळुंखे यांनी माहिती अधिकार कायद्यातील कलमे, वेळापत्रक, अपील प्रक्रिया, निर्णय लेखन, तसेच प्रत्यक्ष प्रकरणांवरील मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणादरम्यान माहिती अधिकार कायद्याच्या अचूक अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या जबाबदाऱ्या, कायदेशीर बाबी, चुका टाळण्यासाठीचे उपाय आणि पारदर्शक प्रशासनाचे महत्त्व यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशिक्षणार्थींनी शंका विचारून समाधानकारक उत्तरे मिळाल्याचे मत व्यक्त केले. सदर प्रशिक्षणामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांचे ज्ञान व आत्मविश्वास वाढून, भविष्यात माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

"माहिती अधिकार कायदा हा पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनाचा कणा आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांना या कायद्याची सखोल समज असणे अत्यंत आवश्यक आहे.

आजचे प्रशिक्षण केवळ औपचारिक नसून प्रत्यक्ष कामात उपयोगी ठरेल असे असून, यामुळे माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी निश्चितच साध्य होईल." - प्रकल्प संचालक पंडित राठोड "या प्रशिक्षणातून माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदी, वेळेचे बंधन आणि निर्णय प्रक्रियेबाबत स्पष्टता मिळाली.

## बिलोली शहरात भव्य नागरी स्वागत सत्कार

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

गोदावरी परिक्रमा करण्यासाठी जवळपास ३०० ते ३५० साधूसंत उत्तर परिक्रमा पुर्ण करुन दक्षिण परिक्रमा करीत असताना साधू संत,महंतांच्या ताफा बिलोली शहरातून नरसीकडे जात असतांना महिला, शालेय विद्यार्थी व प्रतिष्ठीत व्यक्ती,नागरिक भव्य असा स्वागत सत्कार दि.१७ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहाने करण्यात आला. यादरम्यान शहारा जवळील साईबाबा मंदिर ते टोलनाका असे मोटरसायकल भव्य रॅलीचे आयोजन बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेकडून करण्यात आला. गोदावरी परिक्रमा साधू संतांचे आगमना निमित्त स्वागत सत्कार तयारी साठी पुढाकार सतीश गौड मोतीवार व गजानन पांचाळ यांनी घेतला.हरिद्वार,चित्रकुट,वृंदावन,अ



य्योध्या,ओंकारेश्वर,उज्जेन,जगन् नाथ पुरी,येथून संत व महंत मंडळी गोदावरी परिक्रमा करीत आहेत. सकाळी ११-३० वाजता शहरातील जुन्या बसस्थाकानाजवळ जेसीपी द्वारे व अनेक शेकडो भक्तांकडून पुष्पवृष्टी करण्यात आली. तालुक्याच्या वतीने शामराव इनामदार गुरुजी यांनी महंत यांना पुष्पहार घालून आशीर्वाद घेतला. शहरातील व ग्रामीण भागातील अनेक भक्तजन यावेळी शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.

## मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीस ५ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**नांदेड जिल्हाः (समर्थ गांवकरी)**

बिलोली येथील जिल्हा तथा अति. सत्र न्यायधीश .वि.ब. बोहरा यांनी आरोपी गणेश होटलप्पा ऊर्फ प्रभाकर पडमपल्ले वय २० वर्षे, रा. आलूर ता. देगलूर, जि. नांदेड यास कलम ३५४ भा. द. वि. व कलम ९ (म), लैंगीक अत्याचार पासून बालकांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा सिद्ध झाला असून त्या आरोपीस ५ वर्षे सश्रम कारावास व २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे, दांडाची रक्कम न भरल्यास ६ महिने अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रकम पिडीतास नुकसान भरपाई म्हणून देण्याचा आदेश देण्यात आला आहे. देगलूर तालुक्यातील मौजे आलूर येथील घटना दि.१३ जून २०२४ रोजी दुपारी १२ च्या सुमारास पिडित ही तीच्या घराबाहेर खेळत असताना यातील आरोपीने पिडीतास तुझे पप्पा जनावरांच्या गोठयात आहेत असे म्हणुन फिर्यादीच्या घराजवळ असलेल्या जनावरांच्या गोठयात घेवून गेला व तेथे लाकडी बाजवर बलात्कार केला म्हणून आरोपी नामे गणेश होटलप्पा पडमपल्ले (२०) याच्याविरूद्ध पिडीताच्या आईच्या तक्रारीवरुन कलम ३७६,३७६ (एबी) भा. द. वि. व सहकलम ४,६,८ लैंगीक अत्याचार पासून बालकांचे संरक्षण अधिनियम प्रमाणे पो.स्टे. देगलूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यानुसार गुन्ह्याचा पूर्ण तपास करून बालकांचे संरक्षण अधिनियम प्रमाणे तपास अधिकारी एस.एम. शिंगाडे पोलीस उपनिरीक्षक पा.स्टे. देगलूर यांनी अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय १ बिलोली येथे दोषारोपपत्र दाखल केले होते.

त्याप्रमाणे सरकातर्फे एकूण ०५ साक्षीदार तपासण्यात आले,न्यायालयासमोर असलेल्या साक्षी पुराव्याचा विचार करुन तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तिवाद ग्राहय धरुन न्यायधीश वि.ब. बोहरा यांनी दि. १७ डिसेंबर रोजी वरीलप्रमाणे शिक्षा ठोठावली आहे.

## कांदेबाहार केळीवर करपाचा प्रादुर्भाव, मात्र रब्बी पिकांना दिलासा!

**रावेर (समर्थ गांवकरी)**

जळगाव जिल्ह्याच्या पूर्व भागात थंडीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले असून, दिनांक ११ नोव्हेंबर रोजी ममुराबाद मंडळात रात्री किमान ६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. या अचानक





वाढलेल्या गारठ्याचा विपरीत परिणाम कांदेबाहार केळी लागवडीवर होत असून, करपा रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे केळी उत्पादनावर मोठा फटका बसण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करत आहेत.

थंडीचा गारठा वाढल्याने केळीच्या पानांवर करपा वाढून वाढ खुंटत आहे. गेल्या दोन वर्षांपासून केळी पिकावर संकटांची मालिका सुरू असल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. परिणामी या भागातील केळीचे क्षेत्र कमी होऊन, शेतकरी खरिप व रब्बी पिकांकडे वळले आहेत.

मात्र दुसरीकडे, रब्बीच्या पिकांना ही थंडी फायदेशीर ठरत असल्याचे जाणकार शेतकरी सांगतात. हरभरा, गहू, मक्का आदी पिकांना थंडीचा पोषक परिणाम होत असून, उत्पादन वाढीची आशा निर्माण झाली आहे. रावेर, मुक्ताईनगर आणि यावल तालुक्यांमध्ये तापमान सध्या सुमारे १० अंश सेल्सिअस दरम्यान स्थिरावल्याने रब्बी पिकांच्या वाढीस अनुकूल वातावरण मिळत आहे. यावर्षी रब्बी हंगामात नगदी पीक म्हणून मक्याने बाजी मारली असून, त्यानंतर हरभऱ्याचा पेरा मोठ्या प्रमाणात झाला आहे. तेलबिया पिकांचे क्षेत्र मात्र तुलनेने नगण्य आहे. या तालुक्यांमध्ये सुमारे ५० टक्के बागायती क्षेत्र असले तरी जुन्या केळी बागांमध्येही मक्याची पेरणी प्राधान्याने करण्यात आली आहे.

जाणकार शेतकऱ्यांच्या मते हरभरा पीक जमिनीची सुपीकता वाढवते, तर मक्का पीक पुढील हंगामातील उत्पादनावर प्रतिकूल परिणाम करू शकते. तरीदेखील बाजारभाव आणि नगदी उत्पन्नाच्या अपेक्षेने मक्याचा पेरा वाढलेला दिसत आहे.

> गेल्या तीन-चार दिवसांत थंडीचा जोर वाढल्याने रब्बी पिकांमधील अंतर मशागतीच्या कामांना वेग आला आहे. कोळपणी, निंदणी, फवारणी आदी कामे जोरात सुरू असून, येणाऱ्या काळात रब्बी पिकांच्या उत्पादनात वाढ होईल, अशी आशा शेतकरी व्यक्त करत आहेत.
> **— चंद्रकांत कोळी, रावेर**

# कल्याण–लातूर द्रुतगती महामार्गाला हिरवा कंदिल; ४४२ किमीच्या प्रकल्पाला मंजुरी!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

**डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

कल्याण, ठाणे ते लातूर हे अंतर सध्याच्या १० ते ११ तासांऐवजी अवघ्या चार तासांत पार करता यावे, या उद्देशाने प्रस्तावित करण्यात आलेल्या कल्याण–लातूर द्रुतगती महामार्गाला अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. सुमारे ४४२ किलोमीटर लांबीच्या या द्रुतगती महामार्गाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे झालेल्या बैठकीत तत्वतः मंजुरी दिली असून, त्यामुळे हा प्रकल्प आता प्रत्यक्षात उतरण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा पार झाला आहे.

नागपूरमधील आढावा बैठकीत निर्णय: नागपूर येथे मंगळवारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ – एमएसआरडीसी) यांच्या विविध महामार्ग प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी शक्तिपीठ महामार्गासह इतर महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांचे सादरीकरण मुख्यमंत्र्यांसमोर करण्यात आले. या सादरीकरणात कल्याण–लातूर द्रुतगती महामार्गाचे महत्त्व, संभाव्य मार्ग, वाहतूक क्षमता, आर्थिक व सामाजिक लाभ यांची माहिती देण्यात आली.

सादरीकरणानंतर मुख्यमंत्र्यांनी या महामार्गास तत्वतः मंजुरी दिल्याची माहिती एमएसआरडीसीतील सूत्रांनी दिली.

४४२ किमी महामार्ग; सध्या कागदावर, पण लवकरच प्रत्यक्षात: सध्या हा महामार्ग कागदावर असला तरी आता तत्वतः मंजुरी मिळाल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. पुढील टप्प्यात एमएसआरडीसीकडून या प्रकल्पाचा सविस्तर प्रस्ताव राज्य सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे. मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम सुरू होईल.

मार्ग कसा असेल? (संभाव्य मार्ग रेषा)

एमएसआरडीसीच्या प्राथमिक आराखड्यानुसार (अंतिम डीपीआरनंतर बदल संभवतात) हा द्रुतगती महामार्ग मुंबई महानगर क्षेत्रातून थेट मराठवाड्याकडे जाणारा प्रवेश-नियंत्रित कॉरिडॉर असेल.




संभाव्य मार्गरेषा :

कल्याण / ठाणे परिसर – मुंबई महानगर क्षेत्राशी थेट जोड.

मुरबाड – शहापूर पट्टा – पश्चिम महाराष्ट्रातून अंतर्गत भागाकडे सरळ मार्ग.

अहिल्यानगर (नगर) जिल्हा – मध्य महाराष्ट्राचा औद्योगिक व कृषी पट्टा.

बीड जिल्हा – मराठवाड्याचे प्रवेशद्वार.

लातूर (समाप्ती) – मराठवाड्याचे प्रमुख शैक्षणिक व औद्योगिक केंद्र

टीप : भूसंपादन, पर्यावरणीय परवानग्या आणि खर्च-अंदाजानुसार अंतिम डीपीआरमध्ये मार्गात काही बदल होऊ शकतात.

आधुनिक द्रुतगती



महामार्गाची वैशिष्ट्ये:

हा महामार्ग पूर्णपणे प्रवेश-नियंत्रित (Access Controlled Expressway) असणार असून.

दोन्ही बाजूंनी वेगळी वाहतूक व्यवस्था.

ठिकठिकाणी इंटरचेंज, उड्डाणपूल व अंडरपास.

सेवा रस्ते व आपत्कालीन सुविधा.

विश्रांती केंद्रे, इंधन पंप, लॉजिस्टिक हब.

अपेक्षित वेगमर्यादा १२० ते १५० किमी प्रतितास.

प्रवास वेळ, व्यापार व विकासाला गती.

या द्रुतगती महामार्गामुळे, कल्याण–लातूर प्रवास १०–११ तासांवरून ४ तासांपर्यंत कमी होणार.

मराठवाड्यातील शेतमाल व औद्योगिक उत्पादनांना थेट मुंबई बाजारपेठ उपलब्ध.

मालवाहतूक खर्चात घट.

उद्योग, लॉजिस्टिक, सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती.

पुढील प्रक्रिया व कालावधी:

सूत्रांच्या माहितीनुसार, सविस्तर प्रस्ताव तयार करून अंतिम मंजुरी.

मंत्रिमंडळाची मान्यता.

डीपीआर, भूसंपादन व पर्यावरणीय मंजुरी.

त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात.

या सर्व प्रक्रियेसाठी एक ते दीड वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता असून, त्यानंतर प्रत्यक्ष बांधकाम सुरू होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा.कल्याण–लातूर द्रुतगती महामार्ग हा केवळ रस्ता नसून, मुंबई महानगर प्रदेश आणि मराठवाडा यांना वेगाने जोडणारा विकासाचा महामार्ग ठरणार आहे. प्रादेशिक असमतोल कमी करून राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा प्रकल्प भविष्यात महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांमध्ये मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट बँकिंग आणि हुरुन इंडियाकडून भारतातील टॉप २०० सेल्फ-मेड

# एंटरप्रेन्योर्स ऑफ द मिलेनिया २०२५ ची तिसरी आवृत्ती प्रकाशित

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट बँकिंग आणि हुरुन इंडियाने 'आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट अँड हुरुन इंडियाज टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स ऑफ द मिलेनिया २०२५' ची तिसरी आवृत्ती सुरू केली, जी २००० नंतर स्थापन झालेल्या भारतातील २०० सर्वात मौल्यवान कंपन्यांची यादी आहे. या कंपन्यांना त्यांच्या मूल्यानुसार क्रमवारी लावली जाते, सूचीबद्ध कंपन्यांसाठी बाजार भांडवलीकरण आणि सूचीबद्ध नसलेल्या कंपन्यांसाठी मूल्यांकन म्हणून परिभाषित केले जाते. या यादीत येण्यासाठी कट-ऑफ तारीख २५ सप्टेंबर २०२५ होती. ही यादी फक्त भारतात मुख्यालय असलेल्या कंपन्यांचा संदर्भ देते. (राज्य मालकीच्या कंपन्या आणि परदेशी कंपन्यांच्या उपकंपन्या समाविष्ट नाहीत). "मिलेनिया २०२५ च्या भारतातील टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स" यादीतील सर्व कंपन्यांचे एकत्रित मूल्य ४२ लाख कोटी रुपये आहे आणि त्यात भारतातील ५१ शहरांमधील उद्योजकांचा समावेश आहे. यादी सुरू झाल्यापासून पहिल्यांदाच, इटरनलचे संस्थापक दीपिंदर गोयल (४२) यांनी डीमार्टचे आर के दमानी (७०) यांना मागे टाकून प्रथम क्रमांक पटकावला आहे. ८८ उद्योजकांसह बेंगळुरू आघाडीवर आहे, त्यानंतर मुंबई ८३ आणि नवी दिल्ली ५२ उद्योजकांसह, एकत्रितपणे यादीत अर्ध्याहून अधिक कंपन्या आहेत. वित्तीय सेवा क्षेत्रात ४७ कंपन्यांसह अव्वल स्थानावर आहे, त्यानंतर सॉफ्टवेअर आणि सेवा (२८), आरोग्यसेवा (२७) आणि रिटेल (२०) आहेत. उल्लेखनीय म्हणजे, १८९ कंपन्या - यादीतील जवळजवळ ९५% - बाह्य गुंतवणूकदार आहेत, उर्वरित कंपन्यांमध्ये बाह्य गुंतवणूकदार आहेत. आयडीएफसी फर्स्ट बँकेचे संपत्ती व्यवस्थापन आणि खाजगी बँकिंग प्रमुख विकास शर्मा म्हणाले: "भारत त्याच्या उद्योजकता परिसंस्थेच्या गुणवत्तेसाठी जगातील आघाडीच्या राष्ट्रांपैकी एक म्हणून उंच उभा आहे. आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट आणि हुरुन इंडियाच्या सहस्राब्दी २०२५ च्या टॉप २०० स्वयं-निर्मित उद्योजकांच्या तिसऱ्या आवृत्तीत भारताच्या उत्साही स्टार्टअप आणि उद्योजकीय प्रवासाचे आणखी एक वर्ष साजरे केले जात आहे. हा अहवाल देशाच्या आर्थिक परिदृश्याला आकार देणाऱ्या दूरदर्शी नेत्यांच्या असाधारण कथांचा सन्मान करतो. त्यांची लवचिकता, नावीन्य आणि उत्कृष्टतेचा अथक प्रयत्न हे आयडीएफसी फर्स्ट बँकेतील आमच्या मूल्यांचे प्रतिबिंब आहेत. या प्रकाशनाद्वारे, आम्ही अभिमानाने या अग्रणी व्यक्तींना अधोरेखित करतो आणि भारताच्या विकासाच्या कथेला बळकटी देत राहणाऱ्या उद्योजकीय भावनेला जोपासण्याच्या आमच्या वचनबद्धता प्रोत्साहन देते." हुरून इंडियाचे संस्थापक आणि मुख्य संशोधक अनस रहमान जुनैद म्हणाले: "आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट अँड हुरून इंडियाच्या २०२५ च्या सहस्रकाच्या टॉप २०० स्वयंनिर्मित उद्योजकांच्या यादीत भारताच्या अर्थव्यवस्थेवर स्वयंनिर्मित उद्योजकांचा असाधारण प्रभाव दिसून येतो.

त्यांचे एकूण व्यवसाय मूल्य ४६९ अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे - जे भारतातील ३०० सर्वात मौल्यवान कौटुंबिक व्यवसायांच्या मूल्याच्या एक चतुर्थांश आहे, जरी ते गेल्या २५ वर्षांत स्थापन झाले असले तरी, नंतरच्या ७३ वर्षांच्या सरासरी वयाच्या तुलनेत. २०२० नंतर स्थापन झालेल्या पाच कंपन्यांचे एकत्रित मूल्य आता ७८,००० कोटी रुपये आहे. हे उद्योजक वाढ घडवून आणत आहेत आणि राष्ट्र उभारणीत योगदान देत आहेत.

# बेण्टली सिस्टम्सने पुण्यातील शैक्षणिक सहयोगांचा विस्तार केला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

बेण्टली सिस्टम्स, इन्कॉर्पोरेटेड (नॅसडॅक: बीएसवाय) या इन्फ्रास्ट्रक्चर इंजीनिअरिंग सॉफ्टवेअर कंपनीने आज भारतातील डिजिटल इंजीनिअरिंग शिक्षण व संशोधन अधिक प्रगत करण्यासाठी सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एसआयटी), पुणे आणि सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी यांच्यासोबत सामंजस्य करारांवर (एमओयू) स्वाक्षरी करण्याची घोषणा केली. बेण्टलीने प्रत्येक कॅम्पसमध्ये सेंटर ऑफ इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन स्थापित करण्यासाठी एसआयटी आणि सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीसोबत सहयोग केला आहे. ही समर्पित केंद्रे एआय व डिजिटल ट्विन तंत्रज्ञानांचा वापर करत शाश्वत पायाभूत सुविधा डिझाइन, डिजिटल बांधकाम आणि मालमत्ता जीवनचक्र व्यवस्थापनामध्ये प्रगत शिक्षण व संशोधनावर लक्ष केंद्रित करतील.

विद्यार्थी व प्राध्यापकांना बेण्टलीच्या उद्योग-अग्रणी सॉफ्टवेअरचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल, ज्यामध्ये मायक्रोस्टेशन, ओपनरोड्स व ओपनफ्लोज, तसेच जगभरातील अभियांत्रिकी व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात अवलंबलेल्या इतर बेण्टली सॉफ्टवेअर टूल्सचा समावेश असेल. तसेच, बेण्टली एसआयटी व सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी यांच्यासोबत काम करत अभ्यासक्रमाला प्रगत करेल आणि बेण्टली एज्युकेशनच्या माध्यमातून अनुभवात्मक अध्ययन उपक्रमांचा विस्तार करेल. विद्यार्थ्यांना जागतिक सर्वोत्तम पद्धतींशी संलग्न असलेले संरचित अध्ययन मॉड्यूल्स, प्रमाणन आणि प्रकल्प-आधारित प्रशिक्षणामधून फायदा होईल, ज्यासह ते झपाट्याने विकसित होत असलेल्या पायाभूत सुविधा क्षेत्रात उज्ज्वल करिअर घडवण्यास सक्षम होतील. बेण्टली सिस्टम्सचे दक्षिण आशियामधील प्रादेशिक कार्यकारी कमलकन्नन थिरूवदी म्हणाले, सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी यांच्यासोबत आमच्या सहयोगामधून भारतातील भावी इंजीनिअर्सना सक्षम करण्याप्रती बेण्टलीची कटिबद्धता दिसून येते. जागतिक दर्जाचे डिजिटल तंत्रज्ञान आणि अनुभवात्मक अध्ययन संधी उपलब्ध करून देत आमचा नवप्रवर्तकांना निपुण करण्याचा मनसुबा आहे, जे शाश्वत व सर्वोत्तम डिझाइन, बांधकाम व कार्यसंचालनांच्या माध्यमातून भारतातील पायाभूत सुविधा क्षेत्रात परिवर्तन घडवून आणू शकतील.

## 'जगद्धात्री' मालिकेत अ‍ॅक्शन शैलीसाठी सोनाक्षी बत्राने श्रेय दिले प्रियांका चोप्राला!

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' ही मालिका आपल्या उत्कंठावर्धक कथानक, जबरदस्त ड्रामा आणि दमदार अ‍ॅक्शन दृश्यांमुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. एक तरुणी जी आपल्या घरात जणू अदृश्य असते पण मुळातएक धाडसी गुप्त एजंट म्हणून गुन्हेगारांशी लढते आणि आपल्या आईच्या मृत्यूमागील सत्य शोधते. या मालिकेत फर्मान हैदर, सयंतानी घोष, गीता त्यागी आणि इतर कलाकार आहेत. सोनाक्षी बत्रा या मालिकेत मुख्य भूमिका साकारत असून तिने यात काही जबरदस्त अ‍ॅक्शन सीनही केले आहेत. हल्लीच याबद्दल संवाद साधताना या अभिनेत्रीने 'जगद्धात्री' ची अ‍ॅक्शन दृश्ये साकारण्यामागे जागतिक आयकॉन प्रियांका चोप्रा तिची प्रेरणा असल्याचे सांगितले. प्रियांकाच्या आपल्या कलेवरील प्रभावाबद्दल सांगतानासोनाक्षी म्हणाली, "प्रियांका चोप्राच्या अभिनयात जे



उठून दिसते ते म्हणजे ती तीव्रता आणि भावनिक स्पष्टता यांना एकत्र आणते. तिचीअ‍ॅक्शन फक्त शारीरिक नसते, तर ती उद्देशपूर्ण असते. तिची टॅक्टिकल अचूकता, ताकद आणि पात्रानुसार हालचाल हे मला 'जगद्धात्री' मध्ये दाखवायचे आहे. मला तिच्या अ‍ॅक्शन सीनना अधिक धारदार, वास्तववादी आणि तिच्या मूळ स्वभावाशी जोडलेले बनवायचेआहे.'जगद्धात्री' फक्त खलनायकांशी लढत नाही, ती तिच्या मूल्यांसाठी, लोकांसाठी आणि अंतर्गत शक्तीसाठी लढते. प्रत्येक पंच आणि हालचालीत भावनिक खोली आणणे मला अभिनेत्री म्हणून उत्साहित करते." सोनाक्षीला प्रियांका चोप्राच्या 'डॉन', 'क्वांटिको' आणि इतर चित्रपटांमधील अ‍ॅक्शन भूमिकांमधून प्रेरणा मिळते. सोनाक्षीसाठी उद्देश आणि भावनिक खोली यांचा संगम 'जगद्धात्री' च्या प्रवासासोबत पूर्णपणे जुळतो, जिथे एक तरुणी नाजूकपणा आणि प्रचंड धैर्य यांचा समतोल साधते. सोनाक्षीने अशा प्रभावशाली आयकॉनकडून प्रेरणा घेतल्यामुळे प्रेक्षकांना 'जगद्धात्री' मध्ये आणखी आकर्षक, धारदार आणि भावनिक अ‍ॅक्शन सीन पाहायला मिळतील. आता या कथानकात नवीन आव्हाने येणार आहेत. मायाचा चुलत भाऊ रुद्र आणि तपस्या ('जगद्धात्री' ची बहीण) यांच्या लग्नाचा ड्रामा मोठे ट्विस्ट आणणार आहे, तर शिवायच्या वडिलांचा शोधही अधिक तीव्र होणार आहे. ही अ‍ॅक्शन आणि भावना चुकवू नका, पहा 'जगद्धात्री' रोज रात्री 10 वाजता फक्त झी टीव्हीवर.

## पोको सी८५ ५जी च्या फर्स्ट सेलला सुरूवात

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

पोको या भारतातील सर्वात विश्वसनीय ग्राहक तंत्रज्ञान ब्रँडने फक्त फ्लिपकार्टवर नवीन पोको सी85 5जी च्या फर्स्ट सेलला सुरूवात केली आहे. सर्वोत्तम बॅटरी अनुभवासाठी पोको सी85 5जी मध्ये 6000 एमएएच बॅटरी आहे, जी दोन दिवसांहून अधिक कार्यरत राहते. 33 वॅट फास्ट चार्जिंगसह स्मार्टफोन फक्त 28 मिनिटांमध्ये 50 टक्के चार्ज होऊ शकतो, ज्यामधून तुम्ही सतत कार्यरत राहण्याची खात्री मिळते. 10 वॅट वायर्ड रिव्हर्स चार्जिंग डिवाईसला पोर्टेबल पॉवर बँक बनवते, ज्यासह मोबाइल्स, टीडब्ल्यूएस इअरबड्स, स्मार्टवॉचेस् आणि इतर अ‍ॅक्सेसरीज चार्ज करता येऊ शकतात. हा पॉवर-पॅक स्मार्टफोन 12,000 रूपयांपेक्षा कमी किमतीच्या डिवाईसेस श्रेणीमध्ये नवीन मापदंड स्थापित करतो.

## ISST चे संस्थापक संचालक डॉ. विपुल लुनावट यांना CII Sports Business Awards 2025 मध्ये 'Jury Special Mention' सन्मान

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी (ISST) चे संस्थापक संचालक डॉ. विपुल लुनावट यांना प्रतिष्ठित CII Sports Business Awards 2025 अंतर्गत 'Jury Special Mention (University Sports Program / Course of the Year)' या श्रेणीत सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार डॉ. लुनावट यांनी ISST च्या वतीने स्वीकारला. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (CII) यांच्या पुढाकारातून दिले जाणारे CII Sports Business Awards हे भारतातील क्रीडा व्यवसाय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, शैक्षणिक संस्थां, ब्रँड्स आणि व्यक्तींना गौरविण्यासाठी दिले जातात. सन 2025 हे या पुरस्कारांचे तिसरे वर्ष असून,



हे पुरस्कार CII ScoreCard Conclave या प्रतिष्ठित राष्ट्रीय परिषदेसोबत प्रदान केले जातात. या परिषदेमध्ये क्रीडा धोरण, क्रीडा व्यवसाय आणि क्रीडा परिसंस्थेच्या विकासावर सखोल चर्चा होते. हा सन्मान ISST च्या जागतिक दर्जाच्या क्रीडा शिक्षणासाठी असलेल्या दृढ बांधिलकीचे तसेच भारताच्या क्रीडा क्षेत्राचे भविष्य घडवणारे कुशल व्यावसायिक, तज्ज्ञ व नेतृत्व घडवण्याच्या प्रयत्नांचे प्रतीक आहे. या पुरस्कार सोहळ्यात ISST ला भारतातील अनेक नामांकित क्रीडा संस्था व व्यक्तींसोबत गौरविण्यात आले. यामध्ये हरियाणा स्टीलर्स, शिव नरेश, द स्पोर्ट्स स्कूल – बेंगळुरू, शेरू आंग्रिश (संस्थापक – शेरू क्लासिक), सिद्धांत अग्रवाल (संस्थापक – स्पोर्टवोट), मनोज बडाले (लीड ओनर – राजस्थान रॉयल्स), प्रीती झंगियानी (संस्थापक – प्रो पंजा लीग), टाटा स्टील, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड, पॅरालिम्पिक कमिटी ऑफ इंडिया आणि गोस्पोर्ट्स फाउंडेशन यांचा समावेश होता. अशा प्रभावी आणि दूरदृष्टी असलेल्या संस्था व नेतृत्वाच्या पंक्तीत मिळालेला हा सन्मान ISST साठी क्रीडा शिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी आणि भारताच्या क्रीडा परिसंस्थेच्या सर्वांगीण विकासात भरीव योगदान देण्यासाठी नवी प्रेरणा देणारा आहे.

## कॅनरा रोबेको अ‍ॅसेट मॅनेजमेंट कंपनी गुंतवणूकदारांना शिक्षित करणार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कॅनरा रोबेको अ‍ॅसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड (कॅनरा रोबेको म्युच्युअल फंडसाठी गुंतवणूक व्यवस्थापक) ही भारतातील दुसरी सर्वात जुनी म्युच्युअल फंड कंपनी महाराष्ट्र व गोव्यामध्ये आजपासून निवेश बस यात्रा सुरू करण्यास सज्ज आहे, ज्याअंतर्गत म्युच्युअल फंड गुंतवणूकीबाबत जागरूकतेचा प्रसार करण्यात येईल आणि राज्यभरातील गुंतवणूकदारांना शिक्षित करण्यात येईल. या उपक्रमाचा म्युच्युअल फंड गुंतवणूक सोपी करण्याचा आणि राज्यांमध्ये आर्थिक शिक्षण देण्याचा मनसुबा आहे. एक बस महाराष्ट्रातील पुण्यापासून प्रवासाला सुरूवात करेल, ज्यानंतर नाशिक, औरंगाबाद, जालना, अकोला व नागपूर यांसह प्रमुख ठिकाणांपर्यंत प्रवास करत शहरांमधील निवासींमध्ये जागरूकतेचा प्रसार करेल. दुसरी बस कोल्हापूरमधून प्रवासाला



सुरूवात करेल, ज्यानंतर रत्नागिरी, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी येथे प्रवास करेल आणि गोव्यामध्ये या उपक्रमाचे समापन होईल.

आजच्या आर्थिक क्षेत्रात ज्ञान माहिती इतकेच महत्त्वाचे आहे. माहितीपूर्ण गुंतवणूकदार स्वत:साठी उत्तम निर्णय घेण्यासोबत व्यापक आर्थिक परिसंस्था प्रबळ देखील करतो. आम्ही गुंतवणूकीबाबत माहिती सहजसाध्य व कृतीशील करण्याप्रती कटिबद्ध आहोत, असे कॅनरा रोबेको एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी रजनीश नरूला म्हणाले. निवेश बस यात्राचा प्रत्यक्ष समुदायांना आर्थिक शिक्षण देण्याचा मनसुबा आहे. केरळ, पंजाब, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, कर्नाटक, राजस्थान, तेलंगणा, आंध्रप्रदेश, ओडिशा व आसाम अशा राज्यांपर्यंत पोहोचण्यासह आम्ही आता हा उपक्रम महाराष्ट्र व गोव्यामध्ये आणत आहोत, जेथे विविध शहरांमधील निवासींशी संलग्न होऊन त्यांना गुंतवणूक सुलभ करण्यास, मिथकांना दूर करण्यास आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजन करण्यास मदत करू. निवेश बस यात्रा प्रमुख सामुदायिक ठिकाणांना भेट देईल, जेथे निवासींशी कनेक्ट होईल आणि त्यांना व्यावहारिक ज्ञान देईल. साधे प्रात्यक्षिके व डिजिटल टूल्सच्या माध्यमातून या उपक्रमाचा म्युच्युअल फंड्सबाबत गैरसमजांना दूर करण्याचा आणि नियमित, दीर्घकाळापर्यंत गुंतवणूक करण्याचे फायदे स्पष्ट करण्याचा मनसुबा आहे. आम्ही आर्थिक ज्ञान व्यावहारिक व सहजसाध्य करत गुंतवणूकदारांना सक्षम करण्याप्रती कटिबद्ध आहोत. निवेश बस यात्रा या कटिबद्धतेला प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने आमची पद्धत आहे, जेथे प्रत्यक्ष समुदायांसोबत संलग्न होणार आहोत, तसेच गुंतवणूकदारांना भेटून त्यांच्या शंकांचे निरसन करणार आहोत, असे कॅनरा रोबेको एएमसीच्या सेल्स अँड मार्केटिंगचे प्रमुख गौरव गोयल म्हणाले.

## नवी वॉटर हीटर श्रेणी बाजारात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ओरिएंट इलेक्ट्रिक लिमिटेडने भारतीय ग्राहकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेत 'फट् से गरम' या हमीसह अत्याधुनिक वॉटर हीटरची नवी श्रेणी बाजारात दाखल केली आहे. सीकेए बिर्ला समूहाचा भाग असलेल्या या कंपनीने अ‍ॅक्वेटर एज आणि अ‍ॅक्वेटर निओ ही नवी मॉडेल्स सादर केली असून, त्यात जलद हीटिंगसाठी व्हर्लफ्लो टेक्नॉलॉजी आणि टिकाऊ परफॉर्मन्ससाठी ड्युरॉन हीटिंग टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात आला आहे. भारतीय घरांमध्ये विशेषतः हिवाळ्यात पाणी गरम होण्यासाठी लागणारा वेळ आणि कठीण पाण्यामुळे उपकरणांवर होणारे दुष्परिणाम ही मोठी अडचण ठरते. या पार्श्वभूमीवर ओरिएंट इलेक्ट्रिकने विकसित केलेली ही नवी श्रेणी या दोन्ही समस्यांवर प्रभावी उपाय देणारी असल्याचा कंपनीचा दावा आहे.

# सुंबा आर्ट फेस्ट २०२५चे उद्घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आदिवासींची कला ही निसर्गातून लाभलेल्या लयीतून निर्माण झालेली कलानिर्मिती आहे. आदिवासी समाजातील सृजनशीलतेला जागतिक पातळीवर अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे गौरवोद्गार तामिळनाडूतील नीलगिरी येथील आदिवासी संघाचे अध्यक्ष पी. मणी यांनी सुंबा आर्ट फेस्ट २०२५च्या उद्घाटनप्रसंगी काढले. सुंबरान आर्ट फाऊंडेशनतर्फे सुंबा आर्ट फेस्ट २०२५ हा महोत्सव १५ ते २२ डिसेंबर २०२५ या कालावधीत पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड येथे सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. हा कला महोत्सव ज्येष्ठ चित्रकार कै. प्रा. रावसाहेब गुरव यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आला आहे. उद्घाटन सोहळ्याला तामिळनाडूतील नीलगिरी येथील



आदिवासी संघाचे अध्यक्ष पी. मणी, महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या आयुक्त मंजिरी मनोलकर, प्रसिद्ध उद्योजक व कलारसिक विनय फडणीस, चैत्रा क्रिएशन्सच्या संस्थापिका व उद्योजिका तसेच कै. प्रा. गुरव यांच्या कन्या चित्रा मेटे, आदिवासी जीवन, संस्कृती व कलाविष्काराचे अभ्यासक आणि प्रसिद्ध छायाचित्रकार श्रीकृष्ण परांजपे व त्यांच्या पत्नी पूर्वा परांजपे हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सुंबा आर्ट फेस्ट २०२५ मध्ये सहभागी झालेल्या आसाम, मेघालय, तामिळनाडू, ओडिशा आणि महाराष्ट्रातील आदिवासी कलावंतांना कै. प्रा. रावसाहेब गुरव यांनी काढलेले चित्र व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्याचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक आणि मधुमेहतज्ज्ञ डॉ. गौरी दामले यांनी केले.

## रिपब्लिकन एससीचे आव्हान संपुष्टात; उपांत्य फेरीत शूटआउटमध्ये पराभव

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

क्रीडा प्रबोधिनीसह गतविजेत्या इन्कम टॅक्स (आयकर), पुणे संघाने अनुक्रमे पुणे शहर पोलीस आणि रिपब्लिकन एससीचा पराभव मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, नेहरूनगर-पिंपरी येथे सुरू असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. ही नॉक-आउट स्पर्धा हॉकी महाराष्ट्रातर्फे आयोजित करण्यात आली असून डॉ. आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती समारंभाचा एक भाग आहे. उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात बुधवारी, क्रीडा प्रबोधिनीने पुणे शहर पोलिसांवर ३-० असा सहज विजय मिळवला. क्रीडा प्रबोधिनीने वर्चस्व गाजवलेल्या सामन्यात कार्तिक पाठारेने दोन गोल करत विजयात सिंहाचा वाटा उचलला. कार्तिक पाठारेने (७ व्या मिनिटाला) पेनल्टी कॉर्नरवर क्रीडा प्रबोधिनीचे खाते उघडले. त्यानंतर, दुसऱ्या क्वार्टरमध्ये त्याने (२५ व्या मिनिटाला) मैदानी गोल करून क्रीडा प्रबोधिनीची आघाडी गोल दुप्पट केली. त्यामुळे मध्यंतराला विजेत्यांकडे २-० अशी आघाडी होती. उत्तरार्धात, क्रीडा प्रबोधिनीने पहिल्या हाफपेक्षाही अधिक वेगवान आक्रमण केले. त्यामुळे आणखी एका गोलाची भर पडली. सचिन राजगडेने (३१ मिनिटांनी) हा. गोल करत एकूण आघाडी २-० अशी वाढवली. उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात, गतविजेत्या इन्कम टॅक्स, पुणे संघाने रिपब्लिकन एससी संघाचे आव्हान टायब्रेकरमध्ये ६-४ असे परतवून लावले. नियोजित वेळेत वेळेत दोन्ही संघांनी प्रत्येकी तीन गोल (३-३) केले. त्यानंतर टायब्रेकर द्वारे निकालाची कोंडी फोडण्यात आली. त्यात इन्कम टॅक्सने ३-१ असा विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

# एअरबीएनबी अनुभवासह लोल्लापलूझा इंडियाचा आनंद द्विगुणित होणार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आपल्या पहिल्यावहिल्या जागतिक लाईव्ह म्युझिक पार्टनरशिपचा भाग म्हणून एअरबीएनबी २४ आणि २५ जानेवारी रोजी मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या लोल्लापालूझा इंडिया २०२६ मध्ये पाहुण्यांना एक त्यांच्या आवडत्या संगीताच्या जवळ आणणारा एक खास अनुभव देईल. हा भारतातील एअरबीएनबीसाठी एक रोमांचक नवीन अध्याय आहे, जो पर्यटन, संस्कृती आणि सर्जनशीलतेद्वारे लोकांना एकमेकांशी जोडण्याच्या वचनबद्धतेला बळकटी देतो.

बॅकस्टेज टूर्स आणि कलाकारांकडून ज्ञानवर्धक सर्जनशील सत्रांपासून ते लोल्लापालूझा इंडिया इनसाइडरच्या माध्यमातून बिहाइंड दि सीन प्रवेशापर्यंत




प्रत्येक अनुभव भारतातील सर्वात सुंदर संगीत महोत्सवांपैकी एकाच्या निर्मितीमागील प्रयत्नांची एक अविस्मरणीय झलक देतो.

"लाइव्ह संगीत आणि प्रवास नेहमीच एकमेकांसोबत चालले आहेत - चाहते महोत्सवांना फक्त उपस्थित राहत नाहीत, तर ते त्यांचे आयोजन करणाऱ्या शहरांचा शोध घेतात आणि एकमेकांशी नाते जोडतात. त्यातून आपल्या एखाद्या शहराच्या अनुभवाची व्याख्या निर्माण होते," असे एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत बजाज म्हणाले. "लोलापालूझासोबतची आमची भागीदारी या खास एअरबीएनबी अनुभवांच्या माध्यमातून चाहत्यांना त्या जगाच्या जवळ आणते. त्यामुळे या महोत्सवाचा अनुभव फक्त चाहते म्हणून नव्हे तर त्यांच्या कथेचा भाग असलेल्या व्यक्ती म्हणून घेण्याची दुर्मिळ संधी मिळते."

भारतातील ख्यातनाम गायक-गीतकार, संगीतकार आणि कथाकारांपैकी एक असलेल्या अंकुर तिवारींसोबत पडद्यामागील अनुभव घेता येईल. हा खास एअरबीएनबी अनुभव चाहत्यांना अंकुरच्या सर्जनशील जगात प्रवेश करण्यासाठी आमंत्रित करतो. चाहत्यांना दुर्मिळ बॅकस्टेज अनुभव मिळेल, त्याच्या प्रदर्शनपूर्व उपक्रमांचा भाग होता येईल आणि त्यासोबत लोल्लापालूझा इंडियाच्या आफ्टरशोचे आमंत्रणही मिळेल. ही भारतातील ओरिजिनल संगीतांपैकी एक असलेल्या लय, भावना आणि सहकार्याची पडद्यामागील झलक असेल. हा अनुभव २४ जानेवारी २०२६ रोजी घेता येईल. त्यासाठी बुकिंग here येथे करता येईल.

भारतातील लोकप्रिय साउंडट्रॅक आणि स्वतंत्र हिट्सच्या मागे असलेल्या ख्यातनाम संगीतकार-निर्माता जोडी ओएएफएफ आणि सवेरा यांना जवळून पाहता येईल. चित्रपट, पॉप आणि प्रायोगिक इलेक्ट्रॉनिक संगीत एकत्र आणणाऱ्या आवाजासह ते भारताच्या विकसित होत असलेल्या समकालीन संगीताचे प्रमुख शिल्पकार ठरले आहेत. या तल्लीन करणाऱ्या एअरबीएनबी अनुभवात चाहत्यांना या दोघांसोबत स्टेजच्या मागे घडणाऱ्या घटनांचे साक्षीदार होतील. त्यांना शोपूर्वी होणारी सर्जनशील प्रक्रिया अनुभवता येईल. भारतातील दोन ख्यातनाम कलाकार स्टुडिओपासून स्टेजपर्यंत संगीत कसे जिवंत करतात हे पाहण्याची ही एक दुर्मिळ संधी आहे. हा अनुभव २५ जानेवारी २०२६ रोजी घेता येईल. त्यासाठी बुकिंग here येथे करता येईल. भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वात लोकप्रिय लाइव्ह म्युझिक इव्हेंटपैकी एक असलेला शो कशा रितीने घडतो हे जाणून घेण्यासाठी राशी संघवी, लोलापालूझा इंडिया इनसाइडरसोबत सहभागी होता येईल. फेस्टिव्हल प्रोडक्शन आणि जागतिक भागीदारीमागील प्रेरक शक्ती असलेली राशी लाइव्ह एंटरटेनमेंट, ब्रँड समन्वय आणि व्यापक प्रमाणात इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये वर्षानुवर्षांचा अनुभव घेऊन येत आहे. या अनुभवाच्या माध्यमातून राशी आतल्या गोष्टी, रिअल-टाइम माहिती आणि मजेदार अनुभवांची खाण चाहत्यांसमोर उलगडेल.

# कंधार येथे विज्ञान प्रदर्शनांचे उद्‌घाटन संपन्न

**कंधार : (समर्थ गांवकरी)**




कंधार ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनांचे उद्‌घाटन कंधार येथील श्री गणपतराव मोरे विद्यालय, येथे मंगळवार १६ डिसेंबर रोजी करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कंधारचे तहसीलदार रामेश्वर गोरे होते तर उद्‌घाटक म्हणून कंधार पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश पाटील, गटशिक्षणाधिकारी वसंत मेटकर, विज्ञान प्रदर्शनाचे अध्यक्ष राष्ट्रपती पुरस्कार शिक्षक प्रवीण पाटील,कंधार केंद्रप्रमुख माधव कांबळे,उस्माननगर बिटचे केंद्रप्रमुख गादेकर,चिखली बिटचे केंद्रप्रमुख देशमुख, एन.एम. वाघवारे आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप भाषणात गोरे म्हणाले की, तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, प्रयोगशीलता आणि तर्कशुद्ध विचारसरणी विकसित होते. भविष्यातील वैज्ञानिक घडविण्यासाठी हीच पायाभरणी ठरते. विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धेपासून दूर राहून वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

उद्‌घाटनप्रसंगी गटविकास अधिकारी महेश पाटील म्हणाले की, शालेय स्तरावरच विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. या संधीचे सोनं करून विद्यार्थ्यांनी नवकल्पना सादर कराव्यात. यावेळी तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतल्याचे त्यांनी नमूद केले. प्रास्ताविकात गटशिक्षणाधिकारी वसंत मेटकर यांनी विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यामागील हेतू स्पष्ट करताना, प्रयोगाधारित शिक्षण, नवोन्मेष आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना यांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमास तालुक्यातील केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, विषयतज्ज्ञ, साधन व्यक्ती, सहभागी शाळांतील विषय शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनोजवार सर व सोळंके यांनी केले. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक वाघलगावे सहशिक्षक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कर्मचाऱ्यांनी घेतली ऊर्जा संवर्धनाची प्रतिज्ञा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दि.१४ ते २० डिसेंबर, २०२५ या कालावधीत ऊर्जा संवर्धन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिनाचे औचित्य साधून आज दि.१७ डिसेंबर, २०२५ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी उपस्थित प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांना ऊर्जा बचत व पर्यावरण संवर्धनाची प्रतिज्ञा दिली. ऊर्जेचा विवेकी वापर, नवीकरणीय ऊर्जेचा अवलंब आणि दैनंदिन जीवनात ऊर्जा बचतीचे महत्त्व त्यांनी आपल्या मार्गदर्शनात अधोरेखित केले.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, नवोपक्रम व नवसंशोधन सहाचार्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर तसेच विद्युत उपअभियंता अरुण धाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आयक्यूएसीचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजाराम माने, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे, कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहाय्यक कुलसचिव रामदास पेद्देवाड, शिवलिंग पाटील, धर्मपुरी कोंका, राजसाहेब बोराळे, संतोष चव्हाण, शिवाजी चांदणे, बंडू कांबळे यांच्यासह विद्युत विभागातील संजय जाधव, संतोष पद्मे, जितेंद्रसिंग शिलेदार, महेंद्र सरकटे, बाबुराव हंबर्डे, उद्धव सातपुते, राजानंद कजबे, शिवम लुटे, पांडुरंग गोवंदे आदींसह विद्यापीठातील शिक्षक, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ऊर्जा संवर्धनाचा संकल्प करण्यात आला.

# सामाजिक कार्यकर्ते रुपेश जाधव यांच्याकडून अनुयायांना अल्पोपाहार वाटप

## सामाजिक बांधिलकी जपून बाबासाहेबांना अभिवादन

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लाखो अनुयायी दादर, मुंबई येथील चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येत असतात.

या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी भिवंडी तालुक्यातील पडघे, तळवली येथिल सामाजिक कार्यकर्ते रुपेश भगवान जाधव यांनी अल्पोपाहार वाटप करून सामाजिक बांधीलकी जपली आहे. यावेळी दादर , शिवाजी पार्क येथील परिसरात अल्पोपाहार वाटप करण्यात आले. आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आपण सर्वजण पुढे नेऊया , महामानवाच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भीम अनुयायांची सेवा करण्याची संधी मला मिळाली . मी माझी सामाजिक बांधिलकी जपत राहील असे सामाजिक कार्यकर्ते रुपेश भगवान जाधव यांनी बोलतांना सांगितले.

# भीमराव गायकवाड यांचे निधन

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

मौ.लोहा (माडवा) ता.हदगाव येथील सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड भीमराव खोब्राजी गायकवाड (५ ८) यांचे मंगळवार दि .१६ रोजी दुपारी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर लोहा येथील स्मशानभूमित बुधवार दि .१७ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले . त्यांच्या पश्चात पत्नी , एक मुलगी, तीन भाऊ,आई असा परिवार आहे. यांच्या अंत्यसंस्कारावेळी आ. बाबुराव कदम कोहळीकर,मा. आ. माधवराव पाटील जवळगावकर जिल्हा चिकित्सा अधिकारी डॉ. वाकोडे, डॉ.केरबा पाटील, डॉ. संजय मुरमुरे, कैलास डोकळे, डॉ. दीपक नाईक, धनराज सोनटक्के उपस्थित होते.डॉ. शंकरराव चव्हाण वेधकीय महाविद्यालय नांदेड च्या प्रशासकीय सेवेतून दिड महिन्यापूर्वी सेवानिवृत्त झाले होते.

# बिबट्याच्या हल्ल्यातील पीडित कुटुंबाला २५ लाखांची मदत

- आमदार काशिनाथ दाते यांचे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५ पारनेर तालुक्यातील किन्ही येथे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कै. भागूबाई विश्वनाथ खोडदे यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या वतीने २५ लाख रुपयांची आर्थिक मदत आज पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत सुपूर्द करण्यात आली. या मदतीमध्ये १० लाख रुपयांचा धनादेश व १५ लाख रुपये एफडी स्वरूपात विश्वनाथ लक्ष्मण खोडदे यांचे नावे देण्यात आले.

यावेळी आमदार दाते यांनी शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन करत शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. बिबट्यांच्या वाढत्या संचारामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतात व मोकळ्या परिसरात काम करणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, रात्रीच्या वेळी अनावश्यक बाहेर जाणे टाळावे आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार दाते यांनी पुढे सांगितले की, बिबट्यांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर वनविभाग व शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असून भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जातील. नागरिकांच्या जीवित सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंत चेडे, पारनेर प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. गजानन धाडे, भाळवणी वनपाल श्री. के. एस. साबळे, कान्हूर पठार वनरक्षक श्री. एन. व्ही. बडे, भाळवणी वनरक्षक श्री. बी. एस. दवणे, चालक दिगंबर विरोळे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

> बिबट्यांच्या वाढत्या संचाराच्या पार्श्वभूमीवर वनविभाग नागरिकांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देत असून, संवेदनशील भागांमध्ये सतत गस्त, पिंजरे बसवणे व तातडीची कारवाई सुरू आहे. अशा दुर्दैवी घटनांनंतर पीडित कुटुंबाला तात्काळ मदत मिळावी यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांचे सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहून वनविभागाशी समन्वय साधावा.
> **- गजानन धाडे (प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी, पारनेर)**

# कळवण तालुक्यात रस्त्यांची दुरवस्था : खड्ड्यांत अडकलेला विकास

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात; प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे संतापाची लाट!

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील रस्त्यांची अवस्था सध्या अत्यंत विदारक आणि धोकादायक बनली असून, तालुक्यातील नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. कळवण ते नाकोडा, कळवण ते कनाशी, कोल्हापूर फाटा ते अभोना, तसेच रवळजी फाटा ते देसराने या प्रमुख व ग्रामीण मार्गांवर रस्त्यांपेक्षा खड्डेच अधिक दिसत असून, हे रस्ते म्हणजे अपघातांना खुले आमंत्रण ठरत आहेत. रस्त्यांवरील खड्ड्यांची ही ‘चाळण’ तालुक्याच्या विकासाला मारक ठरत असतानाच नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम घडवत आहे. खड्ड्यांतून प्रवास म्हणजे जीव धोक्यात या रस्त्यांवरून वाहन चालवताना वाहनधारकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खड्डे चुकवण्याच्या प्रयत्नात वाहने अचानक वळतात, घसरतात आणि त्यामुळे दररोज छोटे-मोठे अपघात घडत आहेत. नुकताच एका महिलेस गाडी खड्ड्यात गेल्याने गंभीर दुखापत झाली असून, रक्तबंबाळ अवस्थेत तिला उपचारासाठी हलवावे लागले. अशा घटना आता अपवाद न राहता रोजची बाब बनत चालली आहे.

खड्ड्यांमुळे रस्त्यावर उडणाऱ्या प्रचंड धुळीने परिसरात धुरकट वातावरण निर्माण झाले आहे. समोरून येणारे वाहन दिसेनासे होते, परिणामी अपघातांची शक्यता दुपटीने वाढली आहे. दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका आणि सार्वजनिक वाहतूक यांना याचा मोठा फटका बसत आहे.

या रस्त्यांवरून रोजचा प्रवास करणाऱ्या नागरिकांना शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. पाठीचा कणा, कंबर, मान व मणक्यांचे आजार वाढले असून, तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेकजण वैद्यकीय उपचार घेत आहेत. गर्भवती महिला, वृद्ध नागरिक व लहान मुलांसाठी हा प्रवास अधिकच धोकादायक ठरत आहे.

नागरिकांचा संताप अनावर कळवण तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे.

“आम्ही नियमित कर भरतो, पण आमच्या नशिबी फक्त खड्डेच का?” असा सवाल संतप्त नागरिक करत आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा करून आश्वासनं न देता कामं करावे प्रशासन व लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष इतकी गंभीर परिस्थिती असतानाही आमदार, खासदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

### आंदोलनाचा इशारा

प्रशासनाने तात्काळ या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. रस्ते दुरुस्त न झाल्यास जनतेचा संयम सुटेल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासन व लोकप्रतिनिधींवर राहील, असा इशाराही देण्यात येत आहे. आता तरी कळवण तालुक्याच्या रस्त्यांकडे लक्ष दिले जाईल का, की आणखी जीव गेल्यावरच प्रशासन जागे होणार? हा प्रश्न आज प्रत्येक कळवणकर विचारत आहे.

# शेतकऱ्यानं विकली किडनी : नवले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी सावकारानं एका शेतकऱ्याला चक्क स्वतःची किडनी विकायला भाग पाडल्याची गंभीर घटना समोर आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील मिंथूर गावात घडलेल्या या धक्कादायक घटनेमुळं संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. "सावकारानं शेतकऱ्याला त्याची किडनी विकायला लावण्याची घटना संपूर्ण महाराष्ट्राची मान शरमेनं खाली घालायला लावणारी आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि कृषिमंत्री यांनी तातडीनं या प्रकरणाची संपूर्ण चौकशी केली पाहिजे. शेतकऱ्यावर किडनी विकण्याची वेळ आली असेल, तर दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे आणि शेतकऱ्याला सरकारनं तातडीनं मदत दिली पाहिजे. सरकारच्या शेती धोरणामुळं शेतकरी कर्जबाजारी होत आहे.

# स्वारातीम विद्यापीठ सलग ४ दिवस सुट्यामुळे बंद राहणार




**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

सलग चार दिवस सुट्टी येत असल्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे मुख्य परिसर, उपपरिसर लातूर व परभणी, तसेच न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली आणि कै. उत्तम राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट हे सर्व परिसर दि.१८ ते २१ डिसेंबर, २०२५ दरम्यान बंद राहणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

दि.१८ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र खंडोबा माळेगाव यात्रेनिमित्त नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्यानंतर दि.१९ डिसेंबर रोजी विद्यापीठाचे कुलगुरू यांनी बदली सुट्टी जाहीर केली आहे. तसेच दि.२० डिसेंबर रोजी तिसरा शनिवार व दि.२१ डिसेंबर रोजी रविवार असल्यामुळे विद्यापीठ सलग चार दिवस बंद राहणार आहे.

या कालावधीत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज पूर्णतः बंद राहणार असून सर्व संबंधित विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी तसेच अभ्यागतांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी परिपत्रकाद्वारे केले आहे.

# पी.व्ही.आर चौक, नवीन कौठा, नांदेड येथे ट्रॅफिक सिग्नल बसविण्यात यावे

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**



पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीतमध्ये नवीन कौठा, नांदेड पी.व्ही. आर चौक आहे,सदर चौकाचे बाजुला मोठा पी.व्हि.आर मॉल असुन नांदेड शहरातील तसेच ग्रामीण भागातील लोकांची मोठी गर्दी सदर मॉल मध्ये असते,तसेच ग्रामीण भागातील नांदेड कडे जाणारे वाहने व नांदेड शहरातुन ग्रामीण भागाकडे जाणारे वाहने हे सदर चौकातुनच जातात त्यामुळे सदर पी. व्ही. आर चौकात मोठ्या प्रमाणात ट्राफीक रहदारी असल्याने या ठिकाणी ट्राफीक सिग्नल बसविण्याची मागणी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या कडे पत्राद्वारे केली आहे. गेल्या काही दिवसांपुर्वी सकाळी 8 वाजण्याच्या सुमारास सदर चौकात अपघात होऊन एक 3 वर्षाचे लहान मुलांच्या मृत्यू झाला आहे, व त्याचेसोबत असलेले त्याचे आजोबा हे गंभीर जखमी होऊन उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे.याअगोदरही या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात झाले असुन बरेच वेळा अपघाताचे कारणांवरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे रहदारीच्या नियंत्रणासाठी ट्रॅफिक सिग्नल बसविने अत्यंत महत्वाचे आहे. म्हणुन पी.व्ही.आर चौक नवीन कौठा येथे तात्काळ ट्रॅफिक सिग्नल बसविन्यात यावे असे लेखी पत्राद्वारे कळविले आहे.

# सार्वत्रिक निवडणूकीसाठी नांदेड महापालिका प्रशासनाची जय्यत तयारी

## मनपा आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्यी पत्रकार परिषदेत माहिती

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

राज्य निवडणूक अयोगाच्या आदेशानुसार राज्यातील एकुण २९ महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला असुन त्यामध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा सुध्दा समावेश आहे. राज्य निवडणूक आयोगाने निर्देशीत केल्यानुसार दि.१५.१२.२०२५ पासुन पालिका हद्दीत आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असुन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सर्व विभाग प्रमुखांची तातडीची बैठक घेऊन प्रत्यक्ष आचारसंहिता अंमबजावणीसाठी सुचना दिलेल्या आहेत. या निवडणूकीत बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या एकुण २० प्रभागातुन ८१ सदस्य निवडून द्यायचे असुन, त्यातील ४१ महिला आहेत. प्रभाग क्र. २० मधुन ५ सदस्य तर उर्वरीत १९ प्रभागातून प्रत्येकी ४ सदस्य निवडूण द्यायचे आहेत. या निवडणूक प्रक्रियेत एकुण ५०१४९९ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार असुन त्यात २५४९९९ पुरुष मतदार तर २४६६९६ स्त्री व इतर १०४ मतदारांचा समावेश आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि.२३ डिसेंबर, २०२५ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार असुन दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होणार आहे. तदनंतर वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल, उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दि.०२ जानेवारी २०२५ असा असणार असुन दि.०३ जानेवारी २०२५ रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप होणार आहे. त्याचप्रमाणे दि. १५ जानेवारी रोजी मतदान होणार असुन दि. १६ जानेवारी रोजी मतमोजणी पूर्ण करुन निकाल जाहिर करण्यात येणार आहे. या सर्व पार्श्वभुमीवर महापालिका प्रशासन ॲक्शन मोडवर आले असुन पालिका आयुक्तांनी निवडणूक विषयक कामकाज सुलभतेने व विकेंद्रित पध्दतीने पार पाडण्यासाठी विविध निवडणूक व्यवस्थापक कक्षांची स्थापन केली आहे. त्याचप्रमाणे उपजिल्हाधिकारी संवर्गातील ७ निवडणूक निर्णय अधिकारी तर तहसिलदार संवर्गातील ७सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना सहाय्यक म्हणून प्रत्येकी १ क्षेत्रिय अधिकारी व १ उपअभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती पालिका आयुक्तांनी केली आहे. शहराच्या भौगोलिक परिस्थितीनुसार त्या-त्या प्रभागातील नागरिकांच्या सुविधेसाठी एकुण ०७ ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय स्थापित करण्यात आले असुन त्याचे विवरण यासोबतच्या परिशिष्टात नमुद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय निष्हाय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असुन प्रत्येक कार्यालयास प्राथमिक स्वरुपात १० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.




पालिका निवडणूकीसाठी शहरात एकुण ६०० मतदान केंद्र स्थापित करण्यात येणार असुन मतदान केंद्रावर आवश्यक असणारे मतदान यंत्रे त्यापैकी ६६० कंट्रोल युनिट व १३२० बॅलेट युनिट ची मागणी निवडणूक आयोगाकडे करण्यात आल्याचे यावेळी आयुक्तांनी स्पष्ट केले. मतदानाची प्रक्रिया पारदर्शकपणे व सुलभतेने पार पाडण्याठी मतदान केंद्रावर एकुण ३२०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असुन मतमोजणीसाठी ८० कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसह आदर्श आचारसंहिता अंमबजावणीसाठी SST व VST पथकांची नियुक्ती सुध्दा करण्यात येणार असुन ही सर्व निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जवळपास ४२२२ कर्मचा-यांची आवश्यकता असल्याचे यावेळी आयुक्तांनी सांगितले.

# 'एआय' तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक – मुख्यमंत्री

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, वेगवान आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त ठरवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे उपयोग करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत 'समग्र' संस्थेमार्फत सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासंबंधी सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास आरोग्य सेवांची गुणवत्ता निश्चितच वाढेल. तसेच उपचार अधिक अचूक आणि वेळेत उपलब्ध होतील, ज्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा प्रभावीपणे पोहोचवणे शक्य होईल. आजच्या डिजिटल युगामध्ये आरोग्य व्यवस्थेचे डिजिटायझेशन करणे आणि एआय-आधारित उपाययोजना लागू करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या बैठकीत आरोग्य संस्थांचे 'स्टार रेटिंग', सेवांचा समीक्षा अहवाल, आरोग्य हेल्पलाईन सुरू करणे, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि सेवांच्या गुणवत्तेचा नियमित आढावा घेणे अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांमुळे नागरिकांचा आरोग्य सेवांवरील विश्वास अधिक वाढेल, असे श्री. फडणवीस यांनी नमूद केले. आढावा बैठकीदरम्यान 'आपले गाव, आरोग्य संपन्न गाव' योजना, पॉलिएटिव्ह केअर सुविधा, सिकलसेल आजारावरील उपचार पद्धती, वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती प्रक्रिया सोपी करणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मानधन वाढवणे, तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित सेवेत लवकर समावेशन करणे यासंबंधी विविध मागण्या मांडण्यात आल्या. याव्यतिरिक्त, आयुष संचालक, प्रशिक्षण संचालक आणि नर्सिंग क्षेत्रासाठी नवीन पदे निर्माण करण्याची गरजही उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या सर्व महत्त्वाच्या बाबींवर सकारात्मक प्रतिसाद देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी, राज्यातील आरोग्य सेवा अधिक मजबूत करण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली. आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून दीर्घकाळ टिकतील अशा सुधारणा करण्यावर शासनाचा मुख्य भर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीला सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, समग्र संस्थेचे प्रतिनिधी गौरव गोयल यांच्यासह सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# सोयाबीन खरेदीला चांगला प्रतिसाद !

**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**

नारायणगांव येथे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात नाफेडने हमी भावाने सोयाबीन खरेदी सुरु केली असून आतापर्यंत ७८ शेतकऱ्यांकडून १२८.५३ टनाहून अधिक सोयाबीनची खरेदी नारायणगांव केंद्रातून झाली आहे. आतापर्यंत ५०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून शेतकर्यांचा सोयाबीन विक्रीसाठी चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय काळे यांनी दै. सामनाशी बोलताना सांगितले.

खुल्या बाजारात व्यापार्यांकडून ४३ /- रुपये ते ४६/- रुपये प्रति किलो दराने सोयाबीन खरेदी केली जाते. तर ५३.२८ /- रुपये प्रति किलो हमी भावाने नाफेड मार्फत खरेदी केली जाते. शेतक-यांना हमीभावामुळे दोन रुपये जास्त मिळत असले तरी खरेदीची

## मात्र खरेदी मंद गतीने!

गती अतिशय मंद असल्यामुळे गरजवंत शेतकऱ्यांना नाईलाजाने खुल्या बाजारात कमी दरात सोयाबीन विकावे लागत आहे.

सध्या शेतकर्यांची कांदा लागवडीची लगबग सुरु असून कांदारोपे, लागवड मजुरी, औषधे इत्यादी साठी भांडवली खर्च मोठा असल्याने शेतकर्यांना पैशांची निकड भासते, त्यामुळे नाफेडचा नंबर येईपर्यंत शेतकरी थांबू शकत नसल्याने नाईलाजाने शेतकरी खुल्या बाजारात नुकसान सोसून सोयाबीन विकत आहेत. त्यामुळे सोयाबीन खरेदी प्रक्रिया सुलभ व गतीमान करून शेतकर्यांना दिलासा द्यावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी नाफेडकडे नोंद केलेली असतानाही गरजेच्या वेळी नंबर न आल्याने नाईलाजाने त्यांना खुल्या बाजारात सोयाबीन विकावे लागले आहे. नोंदणी केलेल्या शेतकर्यांपैकी क्रमशः रोज फक्त ८ ते १० शेतकर्यांचेच सोयाबीन खरेदी केले जाते, हीच मुख्य अडचण आहे.

नाफेड मार्फत सोयाबीन खरेदीची प्रक्रिया अतिशय किचकट असून एकरी फक्त ९४० किलो सोयाबीन खरेदी मर्यादा असल्याने अतिरिक्त सोयाबीन शेतकर्यांना खुल्या बाजारात विकावे लागत होते. परंतु नुकतीच पुणे जिल्हयासाठी खरेदी मर्यादा एकरी १४६० किलो पर्यंत वाढविल्याने शेतकर्यांना थोडासा दिलासा मिळाला आहे. नाफेड केंद्रावर अल्पदरात (३५० /- रुपये प्रति टन) सोयाबीन चाळण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची सोय झाली आहे.

# नाशिक–पुणे सेमी हायस्पीड रेल्वे मूळ मार्गानेच व्हावी



■ बाळासाहेब थोरात यांची केंद्रीय रेल्वेमंत्र्यांशी चर्चा!

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक–पुणे सेमी हायस्पीड रेल्वे ही मूळ निश्चित झालेल्या मार्गानेच नाशिक, सिन्नर, अकोले, संगमनेर, नारायणगाव, राजगुरुनगर, चाकण मार्गे पुणे धावली पाहिजे, यासाठी माजी आमदार तसेच माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी नुकतीच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

यावेळी थोरात यांनी स्पष्ट केले की, हा मूळ मार्ग भौगोलिक व तांत्रिकदृष्ट्या अत्यंत योग्य असून संपूर्ण परिसराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा आहे. या मार्गावरील अडचणी लक्षात घेऊन २०२० मध्ये सुधारित डीपीआर मंजूर करण्यात आला होता. तसेच रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासनाकडून या प्रकल्पाला आधीच मंजुरी मिळालेली आहे. आपण महसूल मंत्री असताना या प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती, असेही त्यांनी नमूद केले.

नव्याने उपस्थित होत असलेल्या अडचणी तातडीने दूर करून नाशिक–पुणे सेमी हायस्पीड रेल्वे मूळ मार्गानेच जावी, अशी ठाम भूमिका थोरात यांनी रेल्वेमंत्र्यांसमोर मांडली. यासोबतच या मार्गावरील नागरिकांच्या भावना व अपेक्षा त्यांनी स्पष्टपणे मांडल्या.

थोरात म्हणाले, "हा मार्ग आत्ताच रेल्वेने जोडला गेला नाही, तर पुढील अनेक दशके आपल्याला प्रतीक्षा करावी लागू शकते. त्यामुळे या लढाईत सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे."

# विनयभंग केल्याने गुन्हा दाखल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

२३ वर्षीय युवतीचा विनयभंग केल्याची घटना घडली. मुख्य आरोपी अजय ठाणगे आणि इतर दोन अनोळखी इसमांविरुद्ध कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना वाकोडी फाटा, सोलापूर रोड परिसरात दि. १४ डिसेंबर रोजी घडली. आरोपीने मोटारसायकलवरून तक्रारदार युवतीचा पाठलाग केला. रस्ता अडवून मुख्य आरोपी अजय ठाणगे याने युवतीचा उजवा हात पकडला. लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. यासोबतच आरोपींनी पीडित युवतीला शिवीगाळ करत 'पाहून घेतो' अशी धमकी दिली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी मुख्य आरोपी अजय ठाणगे आणि इतर दोन अनोळखी इसमांविरुद्ध कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अखेर रमाई माता चौक ढवळे कॉर्नर ते सिडको लातूर फाटा जडवाहनाना प्रवेश बंद

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

रमाई माता चौक ढवळे कॉर्नर ते वसंतराव नाईक महाविघालय, संभाजी चौक मार्ग डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर फाटा या मुख्य मार्गावर भरधाव वेगाने जाणारी येणारी हायवा,टिप्पर, आयचर यासह चारचाकी वाहनांना भरवस्तीतुन सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात यावी यासाठी ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी संबंधित बांधकाम विभाग व मनपा प्रशासन यांना लेखी पत्राद्वारे कळविल्या नंतर 17 डिसेंबर रोजी जड वाहनांना प्रवेश बंदीसाठी माता रमाई माता ढवळे कॉर्नर येथे लोखंडी कमान टाकून हा रस्ता जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली यामुळे या मार्गावर जड वाहनांना प्रवेश बंद झाला आहे.



नावा मनपाच्या सिडको परिसरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर लातूर फाटा ते रमाई माता चौक ढवळे कॉर्नर मार्गावर गेल्या अनेक दिवसांपासून हायवा, टिप्पर,मोठे ट्रक ,आयचर टेम्पो यासह अनेक चारचाकी वाहने भरवस्तीतुन सुसाट वेगाने जात असल्याने छोटे वाहनांसह नागरीकांना त्रास सहन करावा लागत होता त्यात त्यात या मुख्य मार्गवर, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सह नागरी वसाहत असल्याने दैनंदिन अपघाताचे प्रमाण वाढले होते, याबद्दल परिसरातील नागरिक, सामाजिक संघटना यांनी आंदोलन केल्यानंतर मनपाच्या वतीने दोन्ही बाजूंनी लोखंडी कमान टाकून जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली होती व तिन चार दिवसात कमानीला जड वाहनांने धडक दिल्याने कमान निकामी झाल्याने लोखंडी पोल काढण्यात आले होते, पुन्हा या मार्गावर भरधाव वेगाने मोठी वाहने जाऊ लागल्याने त्रास सहन करावा लागला.

अखेर या बाबत ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पुढाकार घेऊन बांधकाम विभाग नांदेड व मनपा सार्वजनिक बांधकाम विभाग यांना लेखी पत्र देऊन जड वाहनांना प्रवेश बंदी करावी यासाठी पुढाकार घेतला व सदरील ठिकाणी लोखंडी कमान टाकून एक साईड रमामाता चौक येथे बंद करण्यात आली असून बांधकाम विभाग अभियंताएन.एस.सोनटक्के, यांच्या मार्गदर्शनाखाली महामार्ग अभियंता, कर्मचारी यांनी काम केले असून स्वतः हा पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पाहणी केली आहे.

# Ai+ नोव्हाफ्लिपसह फ्लॅगशिप लीगमध्ये सामील झाला

**नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)**

Ai+ स्मार्टफोन्सने आज NovaFlip ची घोषणा केली, ही प्रीमियम फ्लिप स्मार्टफोन मार्केटमध्ये एक नाविन्यपूर्ण भर आहे, ज्याची किंमत ₹४०,००० पेक्षा कमी आहे. हे कंपनीच्या उच्च-गुणवत्तेचे तंत्रज्ञान सर्वांना उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाशी सुसंगत आहे. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत रिलीज होणारे हे उपकरण Ai+ स्मार्टफोन्सच्या फ्लॅगशिप नोव्हा मालिकेची सुरुवात आहे, जी अत्याधुनिक नवोपक्रम आणि परवडणाऱ्या किमतीची जोड देते.



जुलै २०२५ मध्ये नोव्हा ५जी लाँचच्या यशावर आधारित, Ai+ स्मार्टफोन्स नोव्हा मालिकेसह त्यांचे प्रमुख उत्पादन पोर्टफोलिओ वाढवत आहे, ज्यामध्ये नोव्हा प्रो, नोव्हा अल्ट्रा, नोव्हा फ्लिप आणि भविष्यात फोल्ड व्हेरिएंट सारखे मॉडेल समाविष्ट आहेत. प्रत्येक डिव्हाइस जाणूनबुजून उत्कृष्ट कामगिरी, अद्वितीय वैशिष्ट्ये आणि स्मार्टफोन उद्योगात एक नवीन बेंचमार्क सेट करणारा वापरकर्ता अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे.

फ्लिप फॉर्म फॅक्टरला हार्डवेअर नॉव्हेल्टी म्हणून हाताळणाऱ्या पारंपारिक स्मार्टफोन्सच्या विपरीत, नोव्हाफ्लिप NxtQuantum OS वर चालते, जे फोल्डेड आणि ओपन दोन्ही स्थितींमध्ये बुद्धिमानपणे जुळवून घेण्यासाठी डिझाइन केलेले आहे. फोन बंद असताना जलद तपासणी आणि दृश्यमान माहितीसाठी की इंटरॅक्शन्स ऑप्टिमाइझ केले जातात, तर उघडल्यावर संपूर्ण स्मार्टफोन अनुभव प्रदान करतात. NxtQuantum OS चे प्रायव्हसी-फर्स्ट आर्किटेक्चर शून्य प्री-लोडेड ब्लोटवेअर, कोणतेही आक्रमक ट्रॅकर्स नाहीत आणि वैयक्तिक डेटावर पूर्ण वापरकर्ता नियंत्रण सुनिश्चित करते, अल्पकालीन गुंतवणूकीच्या युक्त्यांपेक्षा दीर्घकालीन विश्वासाला प्राधान्य देते. "फ्लिप स्मार्टफोन्स लोकांना खरोखरच चुकवलेल्या गोष्टी परत आणतात: कॉम्पॅक्टनेस, शारीरिक संवाद आणि नियंत्रणाची भावना," Ai+ स्मार्टफोन्सचे सीईओ आणि NxtQuantum Shift Technologies चे संस्थापक माधव शेठ म्हणाले. "त्या अनुभवात नॉस्टॅल्जिया आहे, परंतु त्यामागे एक अतिशय आधुनिक गरज देखील आहे. लोकांना अशी उपकरणे हवी आहेत जी वाहून नेण्यास सोपी, जगण्यास सोपी आणि कमी विचलित होण्याची आवश्यकता असेल." ते पुढे म्हणाले, "नोव्हाफ्लिपमध्ये आजच्या आधुनिक स्मार्टफोनसाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींची ओळख करून दिली आहे. हा एक फ्लिप फोन आहे जो सध्याच्या जीवनशैलीत बसतो, उद्देशपूर्ण, अर्थपूर्ण आणि अशा क्षणांसाठी डिझाइन केलेला आहे जेव्हा तुम्हाला जलद कनेक्ट व्हायचे असेल किंवा डिस्कनेक्ट व्हायचे असेल." नोव्हाफ्लिपचे लाँचिंग एआय+ स्मार्टफोन्ससाठी 5G रोडमॅपमध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो प्रीमियम मार्केटच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्मार्टफोन पोर्टफोलिओमध्ये विविधता आणण्याच्या ब्रँडच्या वचनबद्धतेला बळकटी देतो आणि त्याचबरोबर बजेट-फ्रेंडली देखील आहे.

# "आयडीएफसी फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज" सादर!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

आयडीएफसी फर्स्ट बँकेने गुजरातमधील गिफ्ट सिटीद्वारे अनिवासी भारतीयांसाठी (एनआरआय) विशेषतः डिझाइन केलेले 'आयडीएफसी फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज अकाउंट इन यूएसडी आणि युरो' सादर केले आहे. ही ऑफर देशांतर्गत किंवा एनआरआय बचत खात्यापेक्षा वेगळी आणि विशेषतः अशा ग्राहकांसाठी डिझाइन केलेली आहे जे परकीय चलनात बचत खाते चालवू आणि राखू इच्छितात. आयडीएफसी फर्स्ट बँकेचे प्रमुख रिटेल लायबिलिटीज आशिष सिंग म्हणाले, "फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज अकाउंट हे अनिवासी भारतीयांना भारतासोबत बँकिंग कसे करावे हे पुन्हा परिभाषित करण्यासाठी सज्ज आहे.

# उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा आयव्हरी प्रोग्राम


**पुणे- : (समर्थ गांवकरी)**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आज 'आयव्हरी' नावाचा एक बँकिंग उपक्रम सुरू केला, जो भारतातील उच्च-मध्यमवर्गीय ग्राहकांसाठी तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत वैयक्तिक बँकिंग सेवेला जीवनशैलीशी संबंधित विशेषाधिकारांसह जोडले जाते, ज्यामुळे वर्धित व्यवहार क्षमता, जागतिक पोहोच आणि महत्त्वाचे बँकिंग व्यवहार तसेच सेवांवर शून्य-शुल्क बँकिंगची सुविधा मिळते. यासाठी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची मते जाणून घेण्यात आली आहेत. त्यातूनच हा 'आयव्हरी' कार्यक्रम विकसित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम अशा ग्राहकांसाठी आहे, जे त्यांना जशी जीवनशैली हवी आहे, त्याच्याशी जुळणाऱ्या आर्थिक समाधानांच्या शोधात आहेत. डिजिटल बँकिंगसोबतच मनोरंजन आणि जेवणाचे फायदे यांसारखे निवडक अनुभव ही सेवा देते.

आयव्हरी सदस्यत्वामुळे ग्राहकांना क्लब मॅरियटच्या आदरातिथ्याचा अनुभव घेण्याची संधी मिळते. यामुळे तुम्हाला आशिया पॅसिफिक प्रदेशातील 350 हून अधिक प्रीमियम मॅरियट हॉटेल्समध्ये जेवणाच्या आणि निवासाच्या विशेष लाभांची सुविधा मिळते. या मेंबरशिपमध्ये एअरपोर्ट लाउंज ॲक्सेस, जागतिक स्वीकारार्हता आणि वाढीव व्यवहार मर्यादेसह एक प्रीमियम मेटल डेबिट कार्ड मिळते. ग्राहकांना वार्षिक ओटीटी सबस्क्रिप्शन, त्रैमासिक बूकमायशो व्हाउचर आणि पात्र व्यवहारांवर अतिरिक्त रिवॉर्ड पॉइंट्स देखील मिळतात, जे निवडक प्रीमियम जीवनशैली आणि रिटेल ब्रँड्समध्ये रिडीम करता येतात. अन्य फायद्यांमध्ये महत्त्वाच्या बँकिंग सेवांवर शून्य शुल्क आणि प्रत्येक सदस्यासाठी वैयक्तिक आर्थिक नियोजन आणि समर्थनासाठी एक समर्पित रिलेशनशिप मॅनेजरची नियुक्ती यांचा समावेश आहे.

या लाँचबद्दल उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे रिटेल लायबिलिटीज - TASC आणि TPP विभागाचे प्रमुख श्री. हितेंद्र झा म्हणाले, "आजच्या उच्च मध्यमवर्गीय ग्राहकांना दर्जेदार बँकिंग सेवा मिळवण्यासाठी अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. अनेकांना किमान शिल्लक रकमेची अट, सेवांमधील विसंगती आणि आपल्या जीवनशैलीशी जुळवून न घेणारे सामान्य रिवॉर्ड प्रोग्राम्स यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. निवडक खास सुविधा, रिलेशनशिप मॅनेजर आणि महत्त्वाच्या बँकिंग व्यवहारांवर तसेच सेवांवर शून्य-शुल्क बँकिंगद्वारे 'आयव्हरी' या सर्व आव्हानांवर मात करते.

# विवोची मोहीम कुटुंबांना आनंदी जेवणाच्या क्षणांकडे परत जाण्यास प्रेरित करते



**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

आयुष्याच्या प्रत्येक क्षणात स्मार्टफोन असल्याने, कुटुंबांना जोडणारी जागा हळूहळू शांत होत चालली आहे. एकेकाळी एकत्र बोलणारे आवाज, कथा आणि उबदार हास्य यांनी भरलेले रात्रीचे जेवण आता बहुतेकदा स्क्रीनच्या प्रकाशात हरवले आहे. कनेक्शनचे हे हरवलेले क्षण पुन्हा जिवंत करण्याची गरज ओळखून, विवो इंडिया त्यांच्या #SwitchOff मोहिमेची सातवी आवृत्ती सुरू करत आहे, हा संदेश प्रत्येक भारतीय घराच्या भावनिक केंद्राकडे घेऊन जात आहे: जेवणाच्या टेबलावर. पिढ्यानपिढ्या, जेवणाचे टेबल कौटुंबिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग राहिले आहे, एक अशी जागा जिथे मोकळेपणाने संवाद साधले जात होते, दिवसाच्या गोष्टी ऐकण्यासाठी कोणीतरी होते आणि एकत्र येण्याची भावना हा एक आरामदायी अनुभव होता. डिजिटल एंगेजमेंटमुळे आज कुटुंबांच्या संवादाची पद्धत बदलली आहे, परंतु व्हिव्हो स्विचऑफ स्टडी २०२५ मध्ये या क्षणाचे महत्त्व कायम असल्याचे दिसून आले आहे. अभ्यासानुसार, ७२ टक्के मुले रात्रीच्या जेवणाच्या वेळी त्यांच्या पालकांसोबत सर्वाधिक वेळ घालवतात, ९१ टक्के मुले म्हणतात की त्यांचे फोन बाजूला ठेवल्याने संभाषण सोपे आणि अर्थपूर्ण होते.

# वसमत बसस्थानकाचे काम : भ्रष्टाचाराची भोंगळ बाराखडी !

**वसमत : (समर्थ गांवकरी)**

बसस्थानकाच्या बांधकामात सुरू असलेला भोंगळ कारभार आता लपून राहिलेला नसून उघडपणे समोर येत आहे. एस.टी. महामंडळाचे उपविभागीय अभियंता श्री. सरोदे यांच्याशी संबंधित वृत्तपत्राचे प्रतिनिधीने संपर्क साधला असता त्यांनी, "मी मागील पंधरा दिवसांपासून सुट्टीवर होतो," असे उत्तर दिले.

सुट्टीवर कोण होते, हा मुद्दा दुय्यम आहे; मात्र या संपूर्ण पंधरा दिवसांत साइटवर एकही अभियंता उपस्थित नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीवरून स्पष्ट झाले आहे. अभियंते सुट्टीवर आणि गुत्तेदार मोकाट याचाच फायदा घेत रात्रीच्या अंधारात डस्टमध्येच दुसऱ्या मजल्याचे कॉलम उभारण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे.



दर्जा विचारायचा तर तो केवळ कागदावरच असल्याचे चित्र आहे.

या संदर्भात कनिष्ठ अभियंत्यांनी "सहा कॉलम पाडण्याचे आदेश दिले आहेत," असे सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात आजतागायत एकही निकृष्ट कॉलम हटवण्यात न आल्याचे वास्तव समोर आले आहे. आदेश कागदावर आणि काम प्रत्यक्षात, अशी स्थिती निर्माण झाली आहे. याबाबत पुन्हा उपविभागीय अभियंता श्री. सरोदे यांना प्रश्न विचारला असता, "तुम्ही खाजगी अभियंता पाहा, मी त्याला काम तपासण्याची परवानगी देतो," अशी प्रतिक्रिया देण्यात आली. सरकारी कामाच्या दर्जाबाबत जबाबदारी झटकून खासगी अभियंत्याकडे तपासणी ढकलणे हे वक्तव्यच संपूर्ण गोंधळाचे गंगाराम चित्र उभे करते.बसस्थानकाचे काम सुरुवातीपासूनच लेबर भरोशावर सुरू आहे. काम ए.आर. कन्स्ट्रक्शनला दिले असले, तरी प्रत्यक्षात हे काम लातूर येथील पोटगुत्तेदाराकडून, पुढे मजूर कंत्राटदारामार्फत करून घेतले जात असल्याचे समोर आले आहे. या पोटगुत्तेदारीमुळेच काम सुरुवातीपासून निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप आहे. इस्टिमेटमध्ये धुतलेली वाळू वापरण्याची स्पष्ट अट असतानाही ती केवळ कागदापुरतीच राहिली आहे. प्रत्यक्षात मात्र वसमत परिसरात फरशीखाली वापरली जाणारी डस्टच संपूर्ण बांधकामासाठी वापरली जात असल्याचे दिसून येत आहे. साइटवर कामगारांसाठी कोणतीही सुरक्षा नाही, वॉटरिंग नाही, काँक्रीटमध्ये व्हायब्रेटरचा वापर नाही, अभियंते दिसत नाहीत, तक्रारींवर चौकशी नाही—अशा परिस्थितीत दर्जेदार बांधकाम अपेक्षित कसे धरावे, हा प्रश्न निर्माण होतो.नियमाप्रमाणे कामाचे नाव, कंत्राटदार, खर्चाची रक्कम, कालावधी व निधीचा स्रोत दर्शवणारा माहिती फलक लावणे बंधनकारक असताना, तो फलक सुरुवातीपासूनच जाणीवपूर्वक लपवून ठेवण्यात आल्याचा आरोप आहे. यामागचे कारण स्पष्ट आहे—काम अधिकृत कंत्राटदाराकडे नसून पोटगुत्तेदारांकडे वळवण्यात आले आहे.

या संपूर्ण प्रकरणात आणखी गंभीर बाब म्हणजे एस.टी. महामंडळाचे विभागीय अभियंता श्री. गणेश राजगिरे (राहणार लातूर) हे छत्रपती संभाजीनगर येथे बसून संपूर्ण विभागाचे काम पाहत असल्याचे सांगितले जाते. म्हणजे विभागीय अभियंता लातूरचा, कंत्राटदार लातूरचा आणि पोटगुत्तेदारही लातूरचा—यामुळे काम मिळवण्यासाठी वरपर्यंत 'सेटिंग' असल्याचा संशय अधिक बळावतो.

विभागीय अभियंत्यांचे पाठबळ असल्याने कंत्राटदार बिनधास्तपणे पोटगुत्तेदारी देऊन काम करून घेत असल्याचे बोलले जात आहे. सतत बातम्या प्रसिद्ध होत असल्याने पत्रकारांना, "आमच्यापेक्षा जास्त माहिती तुम्हाला आहे का?" असे खोचक उत्तर दिले जाते. याच पार्श्वभूमीवर "खाजगी अभियंता पाहा" अशी प्रतिक्रिया देण्यात आल्याचेही समोर आले आहे.

इतक्या तक्रारी असूनही विभागीय अभियंत्यांनी एकदाही वसमत बसस्थानकाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी न करणे, तसेच निकृष्ट सहा कॉलम पाडण्याबाबत दिलेल्या आश्वासनावर कोणतीही कारवाई न होणे, हे गंभीर प्रश्न उपस्थित करणारे आहे. कनिष्ठ अभियंत्यांनी दिलेले आदेश कंत्राटदाराने अक्षरशः केराच्या टोपलीत टाकल्याची चर्चा आहे. पहिल्या मजल्यावरील पायऱ्यांची सेंटरिंग शनिवार-रविवारी घाईघाईत करण्यात आली.